॥ ५ ॥ नैवेद्यासी ह्मणे करावें पक्वान्न । पात्रासी दिव्यान्न परवडी ॥ ६ ॥ झाला उपदेश कवळ घ्यारे मुखीं । आपोन शेखीं बुडविलें ॥ ७ ॥ पाषांड करोनी मांडिलें जीविका । बुडवी भाविकां लोकांमती ॥ ८ ॥ कायावाचामनें सोडवी संकल्प । गुरु गुरु जप प्रतिपादी ॥ ९ ॥ शुद्ध परमार्थ बुडविला तेणें । गुरुत्वभूषणें भोग भोगी ॥ १० ॥ ॥ विधिचाही लोप बुडविला वेद । शास्त्रांचा ही बोध हरविला ॥ ११ ॥ योगाची धारणा नाहीं प्राणायाम । सांडी यम नेम निसादिक ॥ १२ ॥ वैराग्याचा लोप हरिभजनीं विक्षेप । वाढविलें पाप मतिलंडें ॥ १३ ॥ तुका ह्मणे गेलें गुरत्व गुखाडी । पूर्वजांसी धाडी नरकवासा ॥ १४ ॥

॥ ६१९१ ॥ शाक्त गधडा जये देशीं । तेथें राशी पापाच्या ॥ १ ॥ सुकृताचा उदो केला । गोंधळ घाला इंद्रियें ॥ २ ॥ क्रोधें रूपें वसे काम । तीचें नाम जपतसे ॥ ३ ॥ मद्यभक्षण मांगिणजाती । विटाळ चित्तीं सांटविला ॥ ४ ॥ स्तवूनियां पूजी रांड । न लजे भांड दाढीसी ॥ ५ ॥ तुका ह्मणे भगवती । नेइल अंतीं आपणापें ॥ ६ ॥

॥ ६१९२ ॥ राजा प्रजा द्वाड देश । शाक्त वास करिती तो ॥ १ ॥ अधर्माचें उबड पीक । धर्म रंक त्या गांवीं ॥ २ ॥ न पिके भूमि कांपे भारें । मेघ वारें दीतील ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघीं दुःखें । येती सुखें वस्तीसी ॥ ४ ॥

॥ ६१९३ ॥ ऐसें कलियुगाच्या मुळें । झालें धर्माचें वाटोळें ॥ १ ॥ सांडूनियां रामराम । ब्राह्मण ह्मणती दोमदोम ॥ २ ॥ शिवों नये ती निळीं । वस्त्रें पांघरती काळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे वृत्ति । सांडुनि गदा मागत जाती ॥ ४ ॥

॥ ६१९४ ॥ अवघ्या पापें घडला एक । उपासक शक्तीचा ॥ १ ॥ त्याचा विटाळ नको अंगा । पांडुरंगा माझिया ॥ २ ॥ काम क्रोध मद्य अंगीं । रंगला रंगीं अवगुणी ॥ ३ ॥ करितां पाप न धरी शंका । ह्मणे तुका कोणी ही ॥ ४ ॥

॥ ६१९५ ॥ वारितां बळें धरितां हातीं । जुलुमें जाती नरकामधीं ॥ १ ॥ रंडिदासाप्रति कांहीं । उपदेश तो ही चालेना ॥ २ ॥ जन्म केला वाताहात । थोर घात ये ठायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे पंढरीनाथा । तुझी कथा दूषीती ॥ ४ ॥

॥ ६१९६ ॥ शाक्तांची शूकरी माय । विष्ठा खाय बिदीची ॥ १ ॥ तिची खा लागली सवे । मागे धांवे म्हणोनी ॥ २ ॥ शाक्तांची गाढवी माय । भुंकत जाय वेसदारा ॥ ३ ॥ तुका म्हणे शिंदळीचे । बोलतां वाचे निंद्य ते ॥ ४ ॥

॥ ६१९७ ॥ हरिहर सांडुनि देव । धरिती भाव क्षुल्लकीं ॥ १ ॥ ऐका त्यांची विटंबणा । देवपणा भक्तांची ॥ २ ॥ अंगीं कवडे घाली गळां । परडी कळाहिन हातीं ॥ ३ ॥ गळां गांठा हिंडे दारीं । मनुष्य परी कुतरीं तीं ॥ ४ ॥ माथां सेंदूर दांत खाती । जेंगट हातीं सटवीचें ॥ ५ ॥ पूजिती विकट दोंद । पशू सोंड गजाचि ॥ ६ ॥ ऐशा छंदें चुकली वाटा । भाव खोटा भजन ॥ ७ ॥ तुका म्हणे विष्णु शिवा । वांचुनि देवा भजती ते ॥ ८ ॥

॥ ६१९८ ॥ कांद्यासाठीं झालें ज्ञान । तेणें जन नाडिलें ॥ १ ॥ काम क्रोध बुचबुची । भुंके पुची व्यालीची ॥ २ ॥ पुजेलागीं द्रव्य मागे । काय सांगे शिष्यातें ॥ ३ ॥ तुका म्हणे कैंचें ब्रह्म । अवघा भ्रम विषयांचा ॥ ४ ॥

॥ ६१९९ ॥ सांडुनियां पंढरीराव । कवणातें ह्मणों देव ॥ १ ॥ बहु लाज वाटे चित्ता । आणिकांतें देव म्हणतां ॥ २ ॥ सांडुनियां हिरा । कोण वेचाव्या त्या गारा ॥ ३ ॥ तुका म्हणे हरिहर । ऐसी सांडुनियां धुर ॥ ४ ॥

॥ ६२०० ॥ बहुतें गेलों वांयां । न भजतां पंढरीराया ॥ १ ॥ करिती कामिकाचि सेवा । लागोन मागोन खात्या देवा ॥ २ ॥ अवघियांचा धनी । त्यासी गेलीं विसरोनी ॥ ३ ॥ तुका म्हणे अंतीं । पडती यमाचिया हातीं ॥ ४ ॥

॥ ६२०१ ॥ असो आतां ऐसा धंदा । तुज गोविंदा आठवूं ॥ १ ॥ रक्षिता तूं होसी जरी । तरि काय येरीं करावें ॥ २ ॥ काया वाचा मन पायीं । राहे ठायीं करूं तें ॥ ३ ॥ तुका म्हणे गाइन गीतीं । रूप चित्तीं धरूनियां ॥ ४ ॥

॥ ६२८२ ॥ नाहीं आम्ही-विष्णुदास । करीत आस कोणाची ॥ १ ॥ कांहे नष्ट करिती निंदा । नेणों सदा आमुची ॥ २ ॥ असों भलते ठायीं मनें । समाधानें आपुलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे करूं देवा । तुझी सेवा धंदा तो ॥ ४ ॥

॥ ६२०३ ॥ मागें संतीं होतें जें जें सांगितलें । तें येऊं लागलें अनुभवा ॥ १ ॥ आचारभ्रष्ट होती लोक कळी । पुण्य क्षीण बळी झालें पाप ॥ २ ॥ वर्ण धर्म कोणी न धरी विटाळ । घालिती गोंधळ एके ठायीं ॥ ३ ॥ वेदाचे पाठक सेवितील मद्य । न देखती भेद विषयीं भांड ॥ ४ ॥ तुका म्हणे किती करावे फजित । तेचि छंद नित्य बहू होती ॥ ५ ॥

## ज्ञाति किंवा वर्णविचार.

॥ ६२०४ ॥ चारी वर्ण झाले जेथोनी निर्माण । तोहा नारायण बाप माझा ॥ १ ॥ मुख तें ब्राह्मण बाहू क्षत्रिय जाण । ह्रदयापासोन वैश्य वर्ण ॥ २ ॥ चरणींचा रहिवास असे या शूद्रासी । तेंथें जळराशी भागिरथी ॥ ३ तुका ह्मणे ऐसें पाहावें पुराणीं । साक्ष आहे वाणी व्यासाची हे ॥ ४ ॥

॥ ६२०५ ॥ वेदविहित तुम्ही आइका हो कर्में । बोलतों तीं वर्में संतांपुढें ॥ १ ॥ चारी वर्ण झाले एकाचिये अंगीं । पापपुण्य भागीं विभागिलें ॥ २ ॥ प्रथम पाउलीं पावविला पंथ । आदि मध्य अंत भेद नाहीं ॥ ३ ॥ आंबे बोरी वड बाभुळा चंदन । गुणागुणें भिन्न अग्नि एक ॥ ४ ॥ तुका ह्मणे मन उन्मन जों होय । तोंवरी हे सोय विधी पाळी ॥ ५ ॥

॥ ६२०६ ॥ ब्रह्मचारी धर्म घोकावें अक्षर । आश्रमीं विचार षटकर्में ॥ १ ॥ वानप्रस्थ तरी संयोगीं वियोग । संन्यास तो त्याग संकल्पाचा ॥ २ ॥ परमहंस तरी जाणे सहज धर्म । तेथें याती धर्म कुळ नाहीं ॥ ३ ॥ बोले धर्म जो चाले या विरहित । तो जाणा पतित श्रुति बोले ॥ ४ ॥ तुका ह्मणे कांहीं नाहीं नेमाविण । मोकळा तो सीण दुःख पावे ॥ ५ ॥

॥ ६२०७ ॥ ज्यासी आवडी हरिनामाची । तोची एक बहू शुची ॥ १ ॥ जपतो हरिनाम बीज । तोची वर्णामाजी द्विज ॥ २ ॥ तुका ह्मणे वर्णधर्म । अवघें आहे समब्रह्म ॥ ३ ॥

॥ ६२०८ ॥ जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ॥१॥ उत्तम चि गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीव खाणी ॥२॥

परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥ ३ ॥ भूतदया गाईपशूचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥ ४ ॥ शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥ ५ ॥ तुका ह्मणे हें चि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥ ६ ॥

॥ ६२०९ ॥ उत्तम सा याति । देवा शरण अनन्यगति ॥ २ ॥ नाहीं दुजा ठाव । कांहीं उत्तम मध्यम भाव ॥२॥ उमटती ठसे । ब्रह्मप्राप्ति अंगीं दिसे ॥ ३ ॥ भाविक विश्वासी । तुका म्हणे नमन त्यांसी ॥ ४ ॥

॥ ६२१० ॥ दुधाळ गाढवी जरी झाली पाहे । पावेल ते काय धेनुसरी ॥ १ ॥ कागाचिया गळा पुष्पांचिया माळा । हंसाची तो कळा काय जाणे ॥ २ ॥ मर्कटें अंघोळी लावियेले टिळे । ब्राह्मणाचे लीळे वर्तू नेणे ॥ ३ ॥ जरी तो ब्राह्मण* झाला कर्मभ्रष्ट । तुका ह्मणे श्रेष्ठ तिहीं लोकीं ॥४ ॥

॥ ६२११ ॥ शुद्धाशुद्ध निवडे कैसें । चर्म मास भिन्न नाहीं ॥ १ ॥ कांहीं अधिक नाहीं उणें । कवण्या गुणें देवासी ॥ २ ॥ उदक भिन्न असे काई । वाहाळ बावी सरिता नई ॥ ३ ॥ सूर्य तेजें निवडी काय । रश्मी रसा सकळा खाय ॥ ४ ॥ वर्णा भिन्न दुधा नाहीं । सकळा गाई सारखें ॥ ५ ॥ करितां भिन्न नाहीं माती । मडक्या गाति भिन्न नांवें ॥ ६ ॥ वर्त्ते एकविध अग्नि । नाहीं मनीं शुद्धाशुद्ध ॥ ७ ॥ तुका ह्मणे पात्र चाड । किंवा विषें अमृत गोड ॥ ८ ॥

॥ ६२१२ ॥ नामधारकासी नाहीं वर्णावर्ण । लोखंड प्रमाण नाना जात ॥ १ ॥ शस्त्र अथवा गोळे भलता प्रकार । परिसीं संस्कार सकळही हेम ॥ २ ॥ पर्जन्य वर्षतां जीवना वहावट । तें समसकट गंगे मिळे ॥ ३ ॥ सर्व तें हें जाय गंगा चि होऊन । तैसा वर्णावर्ण नाहीं नामीं ॥ ४ ॥ महांपुरीं जैसें जातसे उदक । मध्यें तें तारक नाव जैसी ॥ ५ ॥ तये नावेसंगें ब्राम्हण तरती । केवी ते बुडती अनामिक ॥ ६ ॥ नाना काष्ठजात पडतां हुताशनीं । ते जात होऊनी एकरूप ॥ ७ ॥ तेथें निवडेना घुरे कीं चंदन । तैसा वर्णावर्ण नामीं नाहीं ॥ ८ ॥ पूर्वानुओळख तें चि पैं मरण । जरि

---

* ब्रह्मवेत्ता ( ब्रह्मजानातीति ब्राह्मणः ) आपल्या वर्णाचीं कर्में सोडून चालत असतांही तो पवित्र आहे असा भाव समजावा.

पावे जीवन नामामृत ॥ ९ ॥ नामामृतें झाले मुळींचें स्मरण । सहज साधन तुका ह्मणे ॥ १० ॥

॥ ६२१३ ॥ शिखा सूत्र तुझा गुंतला जमान । तंववरि तूं जाण श्रुति दास ॥ १ ॥ त्याची तुज कांहीं चुकतां चि नीत । होसील पतीत नरकवासी ॥ २ ॥ बहुत झालासी चतुर शाहाणा । शुद्ध आचरण चुकों नको ॥ ३ ॥ शिखा सूत्र याचा तोडीं तूं संबंध । मग तुज बाध नाहीं नाहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे तरि वर्तुनि निराळा । उमटती कुळा ब्रम्हींचिया ॥ ५ ॥

॥ ६२१४ ॥ ब्राह्मणा न कळे आपलें तें वर्म । गंवसे परब्रम्ह नामें एका ॥ १ ॥ लाहानथोरासि करितो प्रार्थना । दृढ नारायणा मनीं धरा ॥ २ ॥ सर्वांप्रति माझी हेचि असे विनंती । आठवा श्रीपती मनामाजी ॥ ३ ॥ केशव नारायण करितां आचमन । तेचि संध्या स्नान कर्म क्रिया ॥ ४ ॥ नामें करा नित्य भजन भोजन । ब्रह्मकर्म ध्यान याचे पायीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे हेंचि निर्वाणींचें शस्त्र । ह्मणोनि सर्वत्र स्मरा वेगीं ॥ ६ ॥

॥ ६२१५ ॥ एकीं असे हेवा । एक आनावड जीवां ॥ १ ॥ देवें केल्या भिन्न जाती । उत्तम कनिष्ठ मध्यस्ती ॥ २ ॥ प्रीतिसाठीं भेद । कोणी पूज्य कोणी निंद्य ॥ ३ ॥ तुका ह्मणे ळळा । त्याचा जाणे हा कळवळा ॥ ४ ॥

॥ ६२१६ ॥ ब्राम्हण तो याती अंत्यज असतां । मानावा तत्वता निश्चयेसी ॥ १ ॥ रामकृष्णनामें उच्चारी सरळें । आठवी सांवळें रूप मनीं ॥ २ ॥ शांति क्षमा दया अलंकार अंगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥ ३ ॥ तुका म्हणे गेल्या षडऊर्मी अंगें । सांडुनियां मग ब्रम्हाचि तो ॥ ४ ॥

॥ ६२१७ ॥ तुम्ही नका करूं गर्व । उंच याती मिळून सर्व ॥ १ ॥ शुक्र शोणिताच्या खाणी । तुम्हा आम्हा एकच योनी ॥ २ ॥ रक्त मांस चर्म हाडें । सर्वा ठायीं सम पाडें ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंचि खरें । नाहीं देवासी दुसरें ॥ ४ ॥

॥ ६२१८ ॥ ब्राम्हण तरी एक नरहारि सोनार । ज्यासाठीं शंकर माथां राहे ॥ १ ॥ ब्राम्हण तरी एक सजना कसाई । चक्रधारी गृहीं मांस विकी ॥ २ ॥ तुका ह्मणे ब्रम्ह जाणे तो ब्राम्हण । येरातें नमन करा परतें ॥ ३ ॥

॥ ६२१९ ॥ ब्राह्मण ते कोण ह्मणावें कोणासी । सांगावें आह्मासी कृपानिधी ॥ १ ॥ वेदाचें वचन आठउनी मनीं । बोलावी ते वाणी सत्यं-जय ॥ २ ॥ असत्य बोलतां पूर्वजां दूषण । पहा विचारून श्रुती-मध्यें ॥ ३ ॥ अंघोळी धोत्रें लेतां आभरण । काय इतर जन न करि-तीं ॥ ४ ॥ टिळे माळा मुद्रा नित्य करी श्वान । न्हती ब्राह्मण निश्चयेसीं ॥ ५ ॥ बाबाजी सद्गुरुदास तुका ह्मणे । पुढील कारण सांगों आतां ॥ ६ ॥

॥ ६२२० ॥ सोनियाचें श्वान भाळींचा मुगुट । एकचि कनक मोलें घेतां ॥ १ ॥ दुध तापविलें सोनियाचे भांडीं । मातिचिये हांडीं स्वाद एक ॥ २ ॥ ऊंसाचा परिपाक शूद्रें गुळ केला । ब्राह्मणीं रांधिला स्वाद एक ॥ ३ ॥ गाईचिया जाती असती नानावर्ण । दुधा शुभ्रपण सारिखेंचि ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसा भावार्थ कारण । जाती थोर हीन नाहीं देवा ॥ ५ ॥

---

## कलीचा महिमा.

॥ ६२२१ ॥ कलिधर्म मागें सांगितले संतीं । आचार सांडिती द्विजलोक ॥ १ ॥ ते चि कळों आतां येतसे प्रचिती । अधर्मा टेंकती धर्म न्हे ॥ २ ॥ तप व्रत करितां लागती सायास । पाळितां पिंडास गोड वाटे ॥ ३ ॥ देव म्हणऊनि न येती देऊळा । संसारा वेगळा तरि कां न्हे ॥ ४ ॥ तुका म्हणे मज धरितां गुमान । ऐसे कोणी जन नरका जाती ॥ ५ ॥

॥ ६२२२ ॥ कळयुगामाजी थोर झालें बंड । नष्ट लोक लंड झाले फार ॥१॥ न धरिती सोय न पुसती कोणा । येतें जैसें मनां तैसें चाले ॥ २ ॥ सज्जनाचा वारा टेकों नेदी द्वार । ऐसिया पामरा तारी कोण ॥ ३ ॥ विश्वास तयाचा बैसेना कोठेंही । स्तुती निंदा पाहीं जीवीं धरी ॥ ४ ॥ तुका ह्मणे कैसें केलें नारायणें । जाणावें हें कोणें तया-विण ॥ ५ ॥

॥ ६२२३ ॥ बायलेचा बोल मनासीं लागला । त्याणें तो त्यगिला मायबाप ॥ १ ॥ बहीण ते भाऊ सर्वही त्यागिले । सुखी मन केलें बायलेचें ॥ २ ॥ बायलेच्या गोता आवडीनें पोशी । आदर तयासी पाहुणेर ॥ ३ ॥

एक भाव मन सन्मुख तिष्ठत । तेणें मी पतीत आज्ञा करा ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसा आहे कलीधर्म । परी नेणे वर्म गाढवाचा ॥ ५ ॥

॥ ६२२४ ॥ ऐका कलीचें हें फळ । पुढें होईल ब्रह्मगोळ ॥ १ ॥ चारी वर्ण अठरा याती । भोजन करिती एके पंक्ती ॥ २ ॥ पूजिती असुरां रांडा । मद्य प्राशितील पेंढा ॥ ३ ॥ वामकवळमार्जन । जन जाईल अधःपतन ॥ ४ ॥ तुका हरिभक्ति करी । शक्ति पाणी वाहे घरीं ॥ ५ ॥

॥ ६२२५ ॥ गुरुमार्गामुळें भ्रष्ट सर्वकाळ । ह्मणती याती कुळ नाहीं ब्रह्मीं ॥ १ ॥ पवित्राला ह्मणती नको हा कंटक । मानिती आत्मिक अनामिका ॥ २ ॥ डोहोर होलार दासी बलुती बारा । उपदेशिती फारा रांडापोरां ॥ ३ ॥ कांहीं टाण्या टोण्या विप्र शिष्य होती । उघडी फजिती स्वधर्माची ॥ ४ ॥ नसता करुनी होम खाती एके ठायीं । ह्मणती पाप नाहीं मोक्ष येणें ॥ ५ ॥ इंद्रियांचे पेठे भला कौल देती । मर्यादा जकाती माफ केली ॥ ६ ॥ नाहीं शास्त्राधार पात्रापात्र नेणे । उपदेशून घेणें द्रव्य कांहीं ॥ ७ ॥ तुका ह्मणे ऐसे गुरु शिष्य पूर्ण । विठोबाची आण नरका जाती ॥ ८ ॥

॥ ६२२६ ॥ तुह्मां सांगतों कलयुगा फळ । पुढें होईल ब्रह्मगोळ ॥ १ ॥ आह्मां ह्मणतील कंटक । ऐसा पाडिती दंडक ॥ २ ॥ स्त्रिया पूजुनि सरे देती । भलते स्त्रियेसि भलते जाती ॥ ३ ॥ श्रेष्ठ वर्ण वेदविद्वांस । अंगीकारी मद्यमांस ॥ ४ ॥ चारी वर्ण अठरा याती । कवळ करिती एक पंक्ती ॥ ५ ॥ ह्मणती अंबेचा क्रीडाकल्लोळ । शिवरूप प्राणी सकळ ॥ ६ ॥ ऐसें होईल शकुन देतों । अगोदर सांगुन जातों ॥ ७ ॥ तुका सद्गुरूदास्य करी । सिद्धि पाणी वाहे घरीं ॥ ८ ॥

॥ ६२२७ ॥ त्या हरिदासांची भेटी घेतां । नर्का उभयताही जातां ॥ १ ॥ माते परीस थोरी कथा । भाड घेतां न लाजे ॥ २ ॥ देतां घेतां नरकवासी । उभयतांसी रवरव ॥ ३ ॥ तुका ह्मणे नरकगांवा । जाती हांवा धरोनि ॥ ४ ॥

॥ ६२२८ ॥ पापाचिया मुळें । झालें सत्याचें वाटोळें ॥ १ ॥ दोष झाले बळिवंत । नाहीं ऐसी झाली नीत ॥ २ ॥ मेघ पर्डो भीती । पिकें सांडियेली क्षिती ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । वेदां वीर्य शक्ति नाहीं ॥ ४ ॥

॥ ६२२९ ॥ सांगितले संतीं कलीधर्म मागे । ते आले प्रसंगें आजि कळों ॥ आचार ते भ्रष्ट होती जन लोक । आले सकळीक प्रचितीसी ॥ २ ॥ अधर्मी टेंकले श्रेष्ठाश्रेष्ठ वर्ण । धर्म नव्हे मान राहे कैसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे आन याती ह्मणूं काय । श्रेष्ठ जनीं होय सांडियली ॥ ४ ॥

॥ ६२३० ॥ ऐशी कलीची राहाटी । पडे असत्यासी मिठी ॥ १ ॥ तेणें नामामृता कोणी ॥ वाम मार्गी शिरोमणी ॥ २ ॥ मान दंभ संवसाटी । वर्म चुकली करटी । ३ ॥ व्रत सांडुनियां नेम । वाड झाले ते अधम ॥ ४ ॥ धनलोभी मन ॥ केलें पाहिजे प्रयत्नें ॥ ५ ॥ तुका ह्मणे रांड पुत्र । नेणे सांगती जें शास्त्र ॥ ६ ॥

॥ ६२३१ ॥ ऐका कलीचा आचार । रिझे असत्यासी नर ॥ १ ॥ शुचिर्भूत संध्यास्नान । दावी वरी वरी जन ॥ २ ॥ जप मंत्र नित्य नेम । दावी लोकांसी संभ्रम ॥ ३ ॥ मुखें बोले फार । तैसें न करी साचार ॥ ४ ॥ सर्व बाह्य रंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ ५ ॥ तुका म्हणे तेथ । कैसा राहे दिनानाथ ॥ ६ ॥

॥ ६२३२ ॥ हिंदु तुरकासी तुझें दास्यपण । काय उंच जाण मिरवितां ॥ १ ॥ निर्दया खाटिकी अविद्या महारी । हे तुम्हाअंतरीं नांदताहे ॥ २ ॥ काम तो चाम्हार क्रोध तोचि मांग । कैसी यानें चांग उंच तुम्हां ॥ ३ ॥ दासीवेश्येघरीं तुमचें मैथून । म्हणतां ब्राम्हण लाज नये ॥ ४ ॥ बीज समाऊनी मांस ही भक्षिती । काय ते फजिती सांगों आतां ॥ ५ ॥ इतुकें बोलणें कासया लागतें । सोंवळें नसतें तुम्हा कोणा ॥ ६ ॥ बाबाजीसद्गुरुदास तुका म्हणे । परिसा ब्राम्हण कलियुगीं ॥ ७ ॥

॥ ६२३३ ॥ ऐसें कलीमहिमान । वर्ते अनिवार जन ॥ १ ॥ नवनीता न पुसती । सर्वकाळ सुरापती ॥ २ ॥ आगी लागो त्याच्या तोंडा । काय शिवणें त्या लंडा ॥ ३ ॥ तुका म्हणे घडीपळ । तेथें कैंचा तो गोपाळ ॥ ४ ॥

॥ ६२३४ ॥ बाईलेच्या गोता । पोसी तिच्या मनोगता ॥ १ ॥ मायबाप दुसऱ्याचे द्वारीं । दोघें म्हातारा म्हातारी ॥ २ ॥ ऐसें कलीचें महिमान रक्षी बाइलेचें मन ॥ ३ ॥ तये घरीं कैसी उरी । सुना डांखिणीच्या परी ॥ ४ ॥ तुका म्हणे दोघी सीमा । तेथें बोलण्या झाली सिमा ॥ ५ ॥

॥ ६२३५ ॥ ऐका कलीचें महिमान । असत्यासी रिझले जन ॥ पहा पहा देती अनुमोदन । हेळणा करिती संतांची ॥ १ ॥ गीता लोपली गायत्री । चमत्कार सांडिला मंत्रीं ॥ अश्वासहित त्या कुंवारी । विक्रा करिती ब्राह्मण ॥ २ ॥ अहो पुत्र पित्यापाशीं । सेवा घेती सेवकां ऐसी ॥ भार्या भ्रतारासी । रंका समान मानिती ॥ ३ ॥ मधु पाण्याची शिराणी । नवनीतासी न पुसे कोणी ॥ पतिव्रता दैन्यवाणी । ज्यारिणी खेळती ॥ ४ ॥ अपिक पिके बहुत वस । गाई ह्मैसी सांडिला रस ॥ नगर दिसतसे उदास । बहुत पाखांड पिकलें ॥ ५ ॥ अहो पंढरीनायका । काय पाहतोसी कवतुका ॥ कळीनें गांजितलें लोकां । हाकामारी तुका ह्मणे ॥ ६ ॥

---

## कन्या विक्रय.

॥ ६२३६ ॥ साळंकृत कन्यादान । करितां पृथ्वीसमान ॥ १ ॥ परि तें न कळे या मूढा । येईल कळों भोग पुढां ॥ २ ॥ आचरतां कर्म । भरे पोट राहे धर्म ॥ ३ ॥ सत्या देव साहे । ऐसें करूनियां पाहे ॥ ४ ॥ अन्न मान धन । हें तों प्रारब्धा आधीन ॥ ५ ॥ तुका म्हणे सोस । दुःख आतां पुढें नास ॥ ६ ॥

॥ ६२३७ ॥ दिवट्या वाद्यें लावुनि खाणें । करूनि मंडण दिली हातीं ॥ १ ॥ नवरा नेई नवरी घरा । पूजन वरा पाद्याचें ॥ २ ॥ गौरविली विहीण व्याही । घडिलें कांहीं ठेवूं नका ॥ ३ ॥ करूं द्यावें न्हावें वरें । ठायीचें कां रे न कळे चि ॥ ४ ॥ वऱ्हाडियांचे लागे पाठीं । जैसी उटिका तेलीं ॥ ५ ॥ तुका म्हणे जोडिला थुंका । पुढें नरका सामग्री ॥ ६ ॥

॥ ६२३८ ॥ ब्रम्हहत्या मारिल्या गाई । आणीक काई पाप केलें ॥ १ ॥ ऐका जेणें विकिली कन्या । पवाडे त्या सुन्याचे ॥ २ ॥ नरमांस खादली भाडी । हाका मारी म्हणोनि ॥ ३ ॥ अवघें पाप केलें तेणें । जेणें सोनें अभिळाषिलें ॥ ४ ॥ उच्चारितां मज तें पाप । जिव्हे कांप सुटतसे॥ ५॥ तुका म्हणे कोरान्न रांड । बेटा भांड मागे ना कां ॥ ६ ॥

॥ ६२३९ ॥ याचा कोणी करी पक्ष । तो ही साक्षी समतुल्य ॥ १ ॥ फुकासाठीं पावे दुःखाचा विभाग । पूर्वजांसि लाग निरयदंडीं ॥ २ ॥ ऐके

राजा न करी दंड । जरि या लंड दुष्टासि ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें अन्न। मद्यपानासमान ॥ ४ ॥

॥ ६२४० ॥ कन्येचा जे नर करिती विकरा । ते जाती अघोरा नर्कपाता ॥१॥ नाम गाऊनियां द्रव्य जे मागती। नेणों तयां गती कैशी होय ॥२॥ कैसें होईल त्यांचें तेच हो जाणती । आम्हासी संगती नलगे त्यांची ॥ ३ ॥ आमुचा सांगाती आहे तो श्रीहरी । नलगे दुराचारी तुका म्हणे ॥ ४ ॥

## हिंसा निषेध.

॥ ६२४१ ॥ मांस खातां हाउस करी । जोडुनि वैरी ठेवियेला ॥ १॥ कोण त्याची करील कींव । जीवें जीव नेणती ॥ २ ॥ पुढिलांसाठीं पाजवी सुरी । आपुली चोरी अंगुळी ॥ ३ ॥ तुका म्हणे कुटिती हाडें। आपुल्या नाडें रडती ॥ ४ ॥

॥ ६२४२ ॥ मारूं नये सर्प संतांचिये दृष्टी । होतील ते कष्टी व्यापकपणें ॥१॥ एक सूत्र जिवशिवीं आइक्यता । रोम उपडितां अंग कांपे ॥ २॥ नाहीं साहों येत दुःखाची ते जाती । परपीडा भूतीं साम्य झालें ॥ ३ ॥ तुका ह्मणे दिला नीतीचा संकेत । पुजा नांवें चित्त सुखी तेणें ॥ ४ ॥

॥ ६२४३ ॥ जीवें जीव नेणे पापी सारिका चि । नळी दुजयाची कापूं बैसे ॥ १ ॥ आत्मा नारायण सर्वां घटीं आहे । पशुमध्यें काय कळों नये ॥ २ ॥ देखत हा जीव हुंवरे वरडत । निष्ठुराचे हात वाहाती कैसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे तया चांडाळासी नर्क । भोगिती अनेक महा दुःखें ॥ ४ ॥

## अभाविक, नास्तिक, व तार्किक.

॥ ६२४४ ॥ मातेचीं जो थानें फाडी । तया जोडी कोण ते ॥ १ ॥ वेदां निंदी तो चांडाळ । भ्रष्ट सुतकीया खळ ॥ २ ॥ अगी लावी घरा । मग वसती कोठें थारा ॥ ३ ॥ तुका ह्मणे वर्म । येरा नाचवितो भ्रम ॥ ४ ॥

॥ ६२४५ ॥ जीव तोचि देव भोजन ते भक्ति । मरण ते चि मुक्ति पाषांड्याची ॥ १ ॥ पिंडाच्या पोषकीं नागविलें जन । लटिकें पुराण केले वेद ॥ २ ॥ मना आला तैसा करिती विचार । ह्मणती संसार नाहीं पु-

न्हा ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाठीं उडती यमदंड । पापपुण्य लंड न विचारिती ॥ ४ ॥

॥ ६२४६ ॥ नाइकावे कानीं तयाचे ते बोल । भक्तीविण फोल ज्ञान सांगे ॥ १ ॥ वाखाणी अद्वैत भक्तिभावेंविण । दुःख पावे सीण श्रोता वक्ता ॥ २ ॥ अहं ब्रह्म ह्मणोनि पाळीतसे पिंडा । नो बोलावें भांडा तया सवें ॥ ३ ॥ वेदबाह्य लंड बोले जो पाषांड । त्याचें काळें तोंड संतांमध्यें ॥ ४ ॥ तुका ह्मणे खंडी देवभक्तपण । वरिष्ठ साहूनि श्वपच तो ॥ ४ ॥

॥ ६२४७ ॥ वेद शास्त्र नाहीं पुराण प्रमाण । तयाचें वदन नावलोका ॥ १ ॥ तार्किंयाचें अंग आपणा पारिखें । माजिऱ्या सारिखें वाईचाळे ॥ २ ॥ माता निंदी तया कोण तो आधार । भंगलें खापर याचे नांवें ॥ ३ ॥ तुका म्हणे आडराणें ज्याची चाली । तयाची ते बोली मिठेंविण ॥ ४ ॥

॥ ६२४८ ॥ विठ्ठलनामाचा नाहीं ज्या विश्वास । तो वसे उदास नरकामध्यें ॥ १ ॥ तयासी बोलतां होईल विटाळ । नव जाये तो जळ स्नान करितां ॥ २ ॥ विठ्ठल नामाचि नाहीं ज्या आवडी । त्याची काळ घडी लेखिताहे ॥ ३ ॥ तुका म्हणे मज विठोबाची आण । जरी प्रतिवचन करीन त्यासी ॥ ४ ॥

॥ ६२४९ ॥ तीर्थ जळ देखे पाषाण प्रतिमा । संत ते अधमा माणसां ऐसे ॥ १ ॥ वांजेच्या मैथुनापरी गेलें वांयां । बांडेल्याचें जायां झालें तीक ॥ २ ॥ अभाविक सदा सुतकी चांडाळ । सदा तळमळ चुके चि ना ॥ ३ ॥ तुका म्हणे वरदळी ज्याची दृष्टी । देहबुद्धी कष्टी सदा दुःखी ॥ ४ ॥

॥ ६२५० ॥ अंतरींचें गोड । राहे आवडीचें कोड ॥ १ ॥ संघष्टणें येती अंगा । गुणदोष मनोभंगा ॥ २ ॥ उचिताच्या कळा । नाहीं कळत सकळा ॥ ३ ॥ तुका म्हणे अभावना । भावीं मूळ तें पतना ॥ ४ ॥

॥ ६२५१ ॥ एक परि बहिर बरें । परि तीं ढोरें ग्यानगडें ॥ १ ॥ कपाळास लागली अगी । अभागि को जीतसे ॥ २ ॥ एक परि बरें वेडें । तार्किक कुडें जळो तें ॥ ३ ॥ तुका म्हणे खातडवासी । अमृतासी नोळखे ॥ ४ ॥

॥ ६२५२ ॥ शब्दज्ञानी येऊं नेदी दृष्टीपुढें । छळवादी कुडे अभक्त ते ॥ १ ॥ जळो ते जाणीव जळो त्याचे दंभ । जळो त्याचें तोंड दु-

र्जनाचें ॥ २ ॥ तुका ह्मणे येती दाटूनि छळाया । त्यांच्या बोडूं डोय न धरूं भीड ॥ ३ ॥

॥ ६२५३ ॥ कावळ्याच्या गळां मुक्ताफळमाळा । तरी काय त्याल भूषण शोभे ॥ १ ॥ गजालागीं केला कस्तुरीचा लेप । तिचें तो स्वरूप काय जाणे ॥ २ ॥ बकापुढें सांगे भावार्थवचन । वाउगा चि सीण होय त्यासी ॥ ३ ॥ तुका म्हणे तैसे अभाविक जन । त्यांसी वांयां सीण करूं नये ॥ ४ ॥

॥ ६२५४ ॥ सेकीं हें ना तेंसें झालें । बोलणें तितुकें वांयां गेलें ॥ १ ॥ स्वयें आपणचि रिता । रडे पुढिलांच्या हिता ॥ २ ॥ सुखसागरीं नेघे वस्ती । अंगीं ज्ञानपणाची मस्ती ॥ ३ ॥ तुका ह्मणे गाढव लेखा । जेथें भेटेल तेथें ठोका ॥ ४ ॥

॥ ६२५५ ॥ अखंड संत निंदी । ऐसी दुर्जनाची बुद्धि ॥ १ ॥ काय ह्मणावें तयासी । तो केवळ पापरासि ॥ २ ॥ जो स्मरे रामराम । तयासी म्हणावें रिकामें ॥ ३ ॥ जो तीर्थव्रत करी । तयासी म्हणावें भिकारी ॥ ४ ॥ तुका म्हणे विंचवाची नांगी । तैसा दुर्जन सर्वांगीं ॥ ५ ॥

॥ ६२५६ ॥ पिंडपोषकाच्या जळो ज्ञानगोष्टी । ह्मणी दृष्टिभेटी न हो साची ॥ १ ॥ नाहीं संतचिन्ह उमटलें अंगीं । उपदेशालागीं पात्र झाला ॥ २ ॥ पोहों नेणे कासे लावितो आणिका । म्हणावें त्या मुर्खा काय आतां ॥ ३ ॥ सिणलें तें गेलें सिणलियापासीं । झाली त्या दोघांसी एक गति ॥ ४ ॥ तुका म्हणे अहो देवा दिनानाथा । दरुषण आतां नको त्याचें ॥ ५ ॥

॥ ६२५७ ॥ लटिकयाचें आंवतणें जेविलिया साच । काय त्या विश्वास तो चि खरा ॥ १ ॥ कोल्हांटिणी लागे आकाशीं खेळत । ते काय पावत अमरपद ॥ २ ॥ जळमंडपयाचे घोडे राउत नाचती । ते काय तडवती युद्धालागीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तैसें मतवादीयांचें जिणें । दिसे लाजिरवाणें बोलतां चि ॥ ४ ॥

॥ ६२५८ ॥ किती उपदेश करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ॥ १ ॥ शुद्ध हे वासना नाहीं चांडाळाची । होळी आयुष्याची केली तेणें ॥ २ ॥ नाहीं शुद्ध भाव नायके वचन । आपण्या आपण नाडियेलें ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यासी काय व्याली रांड । करितो बडबड रात्रंदिस ॥ ४ ॥

॥ ६२५९ ॥ म्हणे विठ्ठल पाषाण । त्याच्या तोंडावरि वाहाण ॥ १ ॥ नको नको दर्शन त्याचें । गलितकुष्ट भरो वाचे ॥ २ ॥ शाळिग्रामासि म्हणे धोंडा । किडे पडोत त्याच्या तोंडा ॥ ३ ॥ भावी सद्गुरु मनुष्य । त्याचें खंडो का आयुष्य ॥ ३ ॥ हरिभक्तांच्या करी चेष्टा । त्याचे तोंडी पडे विष्टा ॥ ५॥ तुका म्हणे किती ऐकों । कोठवरी मर्यादा राखों ॥ ६ ॥

॥ ६२६० ॥ वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण । चिरगुटें घालून बाथयाला ॥ १ ॥ तेवीं शब्दज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाठीं विकूनियां ॥ २ ॥ बोलाचिच कढी बोलाचाचि भात । जेवुनियां तृप्त कोण झाला ॥ ३ ॥ कागदीं लिहितां नामाची साकर । चाटितां मधुर गोडी नेदी ॥ ४ ॥ तुका म्हणे जळो जळो ते महंती । नाहीं लाज चित्तीं आठवण ॥ ५ ॥

॥ ६२६१ ॥ स्वप्नींचें धन चित्रींच्या ब्राम्हणा । जातकर्म जाणा वांटिती पैं ॥ १ ॥ तैसें शब्दज्ञान करिती चावटी । ज्ञान पोटासाटीं विकूनियां ॥ २ ॥ बोलाची च कढी बोलाचाचि भात । जेउनियां तृप्त कोण झाला ॥ ३ ॥ कागदीं लिहीतां नामाची साकर । चाखतां मधुर केवि लागे ॥ ४ ॥ तुका म्हणे जळो तैसें ज्ञानबंड । यमपुरीं दंड कठीण आहे ॥ ५ ॥

॥ ६२६२ ॥ म्हणे विठ्ठल ब्रम्ह नव्हे । त्याचे बोल नाइकावे ॥ १ ॥ मग तो हो का कोणी एक । आदि करोनि ब्रम्हादिक ॥ २ ॥ नाहीं विठ्ठल जया ठावा । तोही डोळां न पाहावा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । त्याची भीड मज कांहीं ॥ ४ ॥

॥ ६२६३ ॥ नव्हे हें कवित्व टांकसाळी नाणें । घेती भले जन भले लोक ॥ १ ॥ लागलासे झरा पूर्ण नवनीतें । सेविलिया हित फार होय ॥ २ ॥ तुका म्हणे देवा केला बलात्कार । अंगा आलें फार महंतपण ॥ ३ ॥

॥ ६२६४ ॥ पिंड पोषकांनीं नागविलें जन । लटिके पुराण केले वेद ॥ १ ॥ आपुले मताचें करुनी पाषांड । जनामध्यें भांड पोट भरी ॥ २ ॥ मना वाटे तैसा करुनी आचार । म्हणती हा संसार नाहीं तुम्हा ॥ ३ ॥ तुका म्हणे पाठीं देती यमदंड । पापपुण्य लंड न विचारी ॥ ४ ॥

॥ ६२६५ ॥ मागें पुढें ब्रह्म दाटें । ह्मणती देव आहे कोठें ॥ १ ॥ जयामध्यें येती जाती । तया कोणी नोळखती ॥ २ ॥ मृगनाभीचा परिमळ परि तो हिंडे रानोमाळ ॥ ३ ॥ जळामध्यें मीन राहे । पाणी प्याया बाहेर जाये ॥ ४ ॥ ऐसी भ्रांती जाईल केव्हां । गुरुकृपा होईल तेव्हां ॥ ५ ॥ गुरुकृपा झाल्यावरी । ब्रह्मसृष्टी दिसे सारी ॥ ६ ॥ तुका ह्मणे ऐसी भ्रांती । देव असतां नाहीं ह्मणती ॥ ७ ॥

## व्रताचा महिमा.

॥ ६२६६ ॥ एकादशीस अन्नपान । जे नर करिती भोजन ॥ श्वानविष्ठे समान । अधम जन तो एक ॥१॥ ऐका व्रताचें महिमान । नेमें आचरती जन ॥ गाती ऐकती हरिकीर्तन । ते समान विष्णूशीं ॥२॥ अशुद्ध विटाळसीचें खळ । विडा भक्षितां तांबूल ॥ सांपडे सबळ ॥ काळाहातीं न सुटे ॥ ३ ॥ सेज बाज विलास भोग । करी कामिनीशीं संग ॥ तया जोडे क्षयरोग । जन्मव्याधी बळिवंत ॥ ३ ॥ आपण न वजे हरिकीर्तना । अणिकां वारी जातां कोणा ॥ त्याच्या पापें जाणा । ठेंगणा महा मेरु ॥ ४ ॥ तया दंडी यमदूत । झाले तयाचे अंकित ॥ तुका म्हणे व्रत । एकादशी चुकलीया ॥५॥

॥ ६२६७ ॥ करवितां व्रत अर्धें पुण्य लाभे । मोडवितां दोघे नरका जाती ॥ १ ॥ शुद्ध बुद्धी होय दोघां एक मान । चोरासवें कोण जिवें राखे ॥ २ ॥ आपुलें देउनी आपुला चि घात । न करावा थीत जाणोनियां ॥३॥ देऊनियां वेच धाडी वाराणसी । नेदावें चोरासि चंद्रबळ ॥ ४ ॥ तुका म्हणे तप तीर्थ व्रत याग । भक्ति हे मारग मोडूं नये ॥ ४ ॥

॥ ६२६८ ॥ ज्यासी नावडे एकादशी । तो जिता चि नरकवासी ॥१॥ ज्यासी नावडे हें व्रत । त्यासी नरक तो ही भीत ॥ २ ॥ ज्यास मान्य एकादशी । तो जिता चि मुक्तवासी ॥ ३ ॥ ज्यासी घडे एकादशी । जाणें लागे विष्णूपाशीं ॥ ४॥ तुका म्हणे पुण्यराशी । तो चि करी एकादशी॥५॥

॥ ६२६९ ॥ जया नाहीं नेम एकादशीव्रत । जाणावे ते प्रेत शव लोकीं ॥ १ ॥ त्याचें वय नित्य काळ लेखिताहे । रागें दात खाय करकरां ॥ २ ॥ जयाचिये द्वारीं तुळसी वृंदावन । नाहीं तें स्मशान गृह जा-

णा ॥ ३ ॥ जये कुळीं नाहीं एक ही वैष्णव । त्याचा बुडे भवनदीतापा ॥४॥ विठोबाचें नाम नुच्चारी जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड रजकाचें ॥ ४ ॥ तुका म्हणे त्याचे काष्ठ हातपाय । कीर्तना नव जाय हरिचिया ॥ ५ ॥

॥ ६२७० ॥ कोटी कुळें त्याची पाहताती वाट । वंशांत उद्भट पुत्र झाला ॥ १ ॥ जप तप नेम करी तीर्थाटण । व्रत आचरण एकादशी॥ २ ॥ स्नानसंध्यादान संतांचें पूजन । अतिथीभोजन क्षुधाकाळीं ॥ ३ ॥ तान्हेल्या जविन साधूचा सन्मान । अर्थिल्यासी दान यथाशक्ती ॥ ४ ॥ तुका म्हणे हरीगुणसंकीर्तन । करितां आपण करूं नये ॥ ५ ॥

॥ ६२७१ ॥ एकादशी व्रत करी गाय नाम । तया सर्व नेम घडि-यला ॥ १ ॥ तीर्थाचें जें मूळ व्रतांचें जें फळ । तें मुखीं केवळ नामामृत ॥२॥ एकचि हें व्रत त्रैलोक्या समर्थ । पुरविली आर्त सर्व कांहीं ॥ ३ ॥ एकादशी व्रत नामाचा उच्चार । तुका म्हणे सार सर्वांमध्यें ॥ ४ ॥

॥ ६२७२ ॥ करुनी निर्जळ सावकाश निजे । साधनाचें काज ऐसें नोहे ॥ १ ॥ व्रतांमाजि व्रत श्रेष्ठ एकादशी । प्रिय विठोबासी कोण्या गुणें ॥ २ ॥ करी एकादशी सादर कीर्तनीं । नांव हरिदिनीं बोलीजेल ॥ ३ ॥ तुका म्हणे करा फलहार निश्चीत । बैसा कीर्तनांत सावकाश ॥ ४ ॥

॥ ६२७३ ॥ नायकतां जरी जाय आडराना । नाहीं सोडवण्या तया कोणी ॥ १ ॥ अवघडा मार्गीं दुर्घट त्या रानीं । संगिया निधानीं कैंचा तेथें ॥ २ ॥ न मिळेचि वस्ती सर्गीं आप्तवर्ग । पुससील मग सांग कोणा ॥ ३ ॥ या कारणें करा व्रत एकादशी । सांडी कीर्तनासी आळस हा ॥ ४ ॥ तुका ह्मणे करा कीर्तनजागर । सोपा हा दुस्तर भवसिंधु ॥ ५ ॥

॥ ६२७४ ॥ साधनाचें सार व्रताचें आगर । सांगतों निर्धार धरा कोणी ॥ १ ॥ निराहार रात्रीं करा जागरण । भागवतश्रवण नाम मुखीं ॥ २ ॥ ययानांव व्रत केलें हरीदिनीं । वश चक्रपाणी होय त्यासी ॥ ३ ॥ नाहीं तरी व्यर्थ साधनांची आटी । कधीं नेदी भेटी देव त्यासी ॥ ४ ॥ तुका ह्मणे मज आली हे प्रचीत । ह्मणोनियां नित्य सां-गतसें ॥ ५ ॥

॥ ६२७५ ॥ संतांनीं हा मज केला उपकार । नामीं तो निर्धार धरविला ॥ १ ॥ करी एकादशी कीर्तन उल्हास । गर्जे नामघोष नित्यानिस ॥ २ ॥ धरियला भाव विठोबाचे पायीं । तेणें कोठें नाहीं भ-

वंचिता ॥ ३ ॥ मानिला विश्वास संतवचनासी । दृढ निश्चयासी मानीय
ला ॥ ४ ॥ तुका ह्मणे मधीं नाहीं येऊं कधीं । दिली ही उपाधी विष
माची ॥ ५ ॥

॥ ६२७६ ॥ साधनाची आटी सांडिली किचाट । धरियली वाट न
सोडीं ते ॥ १ ॥ पंधरादिवशीं करी एकादशी । पारणें द्वादशीं सूर्योदयीं
॥ २ ॥ मानिला निश्चय धरियला धीर । कष्टलें शरीर भोगाहातीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं वागविली खंती । आलें गेलें चित्तीं नाशवंत ॥ ४ ॥

॥ ६२७७ ॥ हरीव्रत कोणी न करिती प्राणी । ठेविती गहाणी हात-
वाचा ॥ १ ॥ न ह्मणती नाम देवाकरीं थट्टा । तयासी न भेटे निजसुख
॥ २ ॥ हरीचा जागर न करी पामर । गोंधळीं आदर ऐकावया ॥ ३ ॥
नेम साधनाचा नाहीं जयाठायीं । आडमार्गें पाहीं जाती प्राणी ॥ ४ ॥
धारणी पारणी बगाड नवस । तुका ह्मणे सायास कोणपुण्य ॥ ५ ॥

॥ ६२७८ ॥ सर्व पर्वकाळ येणें चि साधीला । द्वादशी घडला द्वीज-
पंथ ॥ १ ॥ नेमनिष्ठें नाम धरीलें मानसीं । साधनांची राशी हेचि एक
॥ २ ॥ अवघींच तीर्थें आलीं वस्ती घरीं । वास्तव्य पंढरी राहे तेथें ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवें सांगितलें मज । गुह्याचें जें गुज एकांतींचें ॥ ४ ॥

॥ ६२७९ ॥ पुण्य पर्वकाळ पाहतां घडला । हरीभक्त आला घरा
जेव्हां ॥ १ ॥ साधनाची विधी घडली तयासी । साधन द्वादशी पर्वकाळ
॥ २ ॥ पृथ्वीप्रदक्षण भ्रमण तीर्थासी । घडली कथेसी वेळा कोण ॥ ३ ॥
साधूचा सन्मान अतिथीपूजन । तेव्हां आलें जाण पुण्यपर्व ॥ ४ ॥ तुका
ह्मणे केले योगव्रतयाग । एकादशी सांग कोण करी ॥ ५ ॥

॥ ६२८० ॥ रामकृष्ण सखा ऐसा धरी भाव । मीपणाचा ठाव पुशी
पणा ॥ १ ॥ शरण सर्वदा ह्मणे तूं गोविंदा । वाचे लावी धंदा नारायण
॥ २ ॥ यापरी सोपान नाहीं तें साधन । वाहतसें आण तुझी मना ॥ ३ ॥
कांहीं करूं नको आळस अंतरीं । जपे निरंतरीं रामनाम ॥ ४ ॥ तुका ह्मणे
मोठा लाभ नरदेहीं । देहींच विदेही होती नामें ॥ ५ ॥

॥ ६२८१ ॥ गातां ऐके नाम कंटाळा जोकरी । वास त्या अघोरीं
नर्कवासीं ॥ १ ॥ रागें यमधर्म जाचवी तयासी । दिधले काशासी मुख
कान ॥ २ ॥ विषयाच्या सुखें अखंड जागसी । नये एकादशी जागरण
॥ ३ ॥ वेंचुनियां धन सेवी मद्यपान । नाहीं दिलें अन्न अतीतासी ॥ ४ ॥

तीर्थाटण नाहीं केला उपकार । पाळीलें शरीर पुष्ट लोमें ॥ ५ ॥ तुका ह्मणे मग केला साह्य दंड । नाइकती लंड सांगितले ॥ ६ ॥

॥ ६२८२ ॥ माझिया चित्तासी बहुत हे आशा । पुराणपुरुषा पांडुरंगा ॥ १ ॥ भेटिलागीं हेत आवडी जीवाची । वासना मनाची फेडा माझी ॥ २ ॥ तूंची आम्हालागीं जन्म जन्मांतरीं । धांव झडकरी भेट आतां ॥ ३ ॥ पूर्वीं तुवां भक्त तारीले अमीत । करुनियां नित्य नेमव्रत ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुह्मी कृपाळु बहुत । दाखवीं त्वरीत रूप डोळां ॥ ५ ॥

॥ ६२८३ ॥ नावडे ती एकादशी । तोचि जिता नर्कवासी ॥ १ ॥ ज्यासी नावडे हें व्रत । त्यासि नर्क तोही भीत ॥ २ ॥ ज्यासी मान्य एकादशी । तोचि जिता मुक्तवासी ॥ ३ ॥ ज्यासी घडे एकादशी ॥ जाणें लागे विष्णुपाशीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे पुण्यराशी । तोचि करी एकादशी ॥ ५ ॥

॥ ६२८४ ॥ ऐका याचा परीहार । चित्त देऊनी सादर ॥ १ ॥ गज सांगितलें देवें । तेंचि कारितसें ठावें ॥ २ ॥ सोपी एकादशी । नाम कीर्ति अहर्निशी ॥ ३ ॥ तेणें जिवा सोडवण । सुख होय नारायण ॥ ४ ॥ तुका ह्मणे तारी । बाळ भोळियां उद्धरी ॥ ५ ॥

॥ ६२८५ ॥ व्रत एकादशी करी । नेमवारी दयासी ॥ १ ॥ जन्म ऐसा घडो देवा । त्यासी व्हावा वंशासी ॥ २ ॥ ज्याचे ध्यानीं केशीराज । सत्य बीज त्या पाशीं ॥ तुका म्हणे पूर्ण ठेवा । तरी दैवा लाभे हें ॥ ४ ॥

॥ ६२८६ ॥ एकादशी व्रत । केवळ वैकुंठींचा पंथ ॥ १ ॥ रुक्मांगदें व्रत केलें । नगर वैकुंठासी नेलें ॥ २ ॥ सानें नेला एक गांव । आपण एकले तरी जीव ॥ ३ ॥ तुका ह्मणे करा काज । धरा एकामेकां लाज ॥ ४ ॥

## शूद्र दैवतांचा उपहास.

॥ ६२८७ ॥ नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ॥ १ ॥ बळिया माझा पंढरीराव । जो या देवांचाही देव ॥ २ ॥ रंडी चंडी शक्ति । मद्यमांसातें भक्षिती ॥ ३ ॥ बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाठीं देव ॥ ॥ ४ ॥ गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ॥ ५ ॥ मुंज्या ह्मैसासुरें । हें तों कोण लेखी पोरें ॥ ६ ॥ वेताळें फेताळें । जळो त्यांचें तोंड काळें ॥ ७ ॥ तुका ह्मणे चित्तीं । धरा रखुमाईचा पती ॥ ८ ॥

॥ ६२८८ ॥ फटकाळ देव्हारा फटकाळ अंगारा । फटकाळ विचार चालविलें ॥ १ ॥ फटकाळ तो देव फटकाळ तो भक्त । करवितो घात आणिका जीवा ॥ २ ॥ तुका ह्मणे अवघें फटकाळ हें जन । अनुभवियें खूण जाणतील ॥ ३ ॥

॥ ६२८९ ॥ शिव शक्ति आणि सूर्य गणपती । एकच ह्मणती विष्णूसही ॥ १ ॥ हिरा गार दोनी मानिती समान । राजस भजनें वांयां जाती ॥ २ ॥ अन्य देवतांसी देव ह्मणऊन । तामस जीवन तमोयोग्या ॥ ३ ॥ वांयां जायासाठीं केलासे ह्व्यास । अन्यदेवतांस देवपण ॥ ४ ॥ आपुलिया मुखें सांगतसे धणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥ ५ ॥ धन्य ते वैष्णव भजती केशव । सात्विक हे जीव मोक्षा योग्य ॥ ६ ॥ तुका ह्मणे मोक्ष नाहीं कोणापासीं । एका गोविंदासी शरण व्हारे ॥ ७ ॥

---

## ज्ञानबोध.

॥ ६२९० ॥ मूळ शोधावें आपुलें । एका सद्गुरूच्या बळें ॥ १ ॥ मुळापासोनि विस्तार । कैसा झाला तो ओंकार ॥ २ ॥ कोठें प्राणी वाहातो कोण अन्य चालवितो ॥ ३ ॥ अहो इडा आणि पिंगला । तिसरी सुषुम्ना ती बाला ॥ ४ ॥ अहो चंद्रसूर्य दोन । त्यांचें कोणतें ठिकाण ॥ ५ ॥ अर्धमात्रा जीव शीव । कोठें राहती पहा हो ॥ ६ ॥ चारी शुन्यें चारी देह । यांचें ठिकाण कोठें आहे ॥ ७ ॥ चारी वाचा कोणा ठायीं । यांसी शोधुनियां पाही ॥ ८ ॥ बारा आणि चारी सोळा । सत्रावी ती जिवनकळा ॥ ९ ॥ षडक्षरी मंत्रराज । कोण चक्र कोण बीज ॥ १० ॥ अक्षरें कोणतीं ह्मणावीं । त्यांचीं नामें सांगून द्यावीं ॥ ११ ॥ फानसाचा केला लेखा । दोन राहिल्या मात्रुका ॥ १२ ॥ तें तर संतांचें निजगुज । कोठें राहे सोहं बीज ॥ १३ ॥ कोठें आहे चंद्रभुवन । कोण मेरूचें ठिकाण ॥ १४ ॥ सप्त पाताळें कोणतीं । एकविस स्वर्गांची गणती ॥ १५ ॥ अहो पृथ्वीची गणती । शोधून पाहावी देहांतीं ॥ १६ ॥ आकाशाचा वारा किती । याची करावी गणती ॥ १७ ॥ किती पर्जन्याच्या धारा । वाहाती सप्तही सागरा ॥ १८ ॥ नव नाडी कुंडलनी । वाहे सत्रावीचें पाणी ॥ १९ ॥ तत्व झाडा कैसा

आहे । हें तो शोधुनियां पाहे ॥ २० ॥ कोठें अनुहात गजर । वाजतें दश-वें हें धतुर ॥ २१ ॥ अहो पंधरा द्वारे वाटे । कवण ठायीं बाहात्तर कोटे ॥ २२ ॥ कोठें अष्टादश कमळ । कोठें मनपुरीचा खेळ ॥२३॥ चारी मुक्ती-चें ठिकाण । देहामध्यें कोण कोण ॥ २४ ॥ चारी मुद्रा शोधुन पाही । लक्ष लक्षुनियां घेई ॥ २५ ॥ त्रिपद कैसा लोक । हा तंव पाहिजे कलंक ॥ २६ ॥ अहो त्रिपद गायत्रीचा । सांगा चौथा पाय कैंचा ॥ २७ ॥ सचि-दानंद ते कोणते । यांचें स्वरूप शोधुन पाहे ॥२८॥ तीन मार्ग ते जाणावे । कासीवासी ते ह्मणावे ॥ २९ ॥ सोहं धारण कोणती । तीही जाणावी नि-रुती ॥ ३० ॥ ओहं मायेचें रूप काय । ऐसें शोधोनियां पाहे ॥ ३१ ॥ अविद्येचि कैसी काय । कळलें धन्य त्याची माय ॥ ३२ ॥ देह पुर्वी कोण होता । देह पडल्या कोठें जाता ॥ ३३ ॥ जीवशिवाचें कैसें काय । रूप तें हो कैसें आहे ॥ ३४ ॥ तुर्या ह्मणावी काशाला । कळली पाहिजे ज्याची त्याला ॥ ३५ ॥ अष्टधा प्रकृती झाली । तेही पाहिजे कळली ॥ ३६ ॥ पांच पंचवीस तत्वगुण । हेहीं करावें निरसन ॥ ३७ ॥ स्वप्न देखें मी सा होय । वीर्य खळलें खळोन राहे ॥ ३८ ॥ कर्म इंद्रियांची गणति । ज्ञानी इंद्रियें जा-णती ॥ ३९ ॥ पंचविसावें अंतस्मरण । दसवे उदास प्राण ॥ ४० ॥ अवि-द्येचें निरसन । पिंड ब्रह्मांड हें पान ॥ ४१ ॥ बारा सोळा असती क-ळा । ह्या तंव जाणाव्या सकळा ॥ ४२ ॥ अहो ओंकाराचें बीज । हें तंव कळलें पाहिजे ॥ ४३ ॥ चौदा चक्रांचा उभारा । केला पाहिजे हा सारा ॥ ४४ ॥ अणु नावाच्या भुमिका चारी । कळल्या पाहिजे निरधारी ॥४५॥ योग अष्टांग साधन । । कळलें पाहिजे तें कवन ॥ ४६ ॥ कैसें षडचक्र येोडें । सहस्र दळ केलें पुढें ॥ ४७ ॥ अष्टापुराचें धनु केलें । षड्वैरी नि-र्दाळिले ॥ ४८ ॥ भगवंताचें कैसें काय । स्वरूप शोधुनियां पाहे ॥ ४९ ॥ स्वरूप पहावयासी गेला । देह आपण स्वयंभु झाला ॥ ५० ॥ षड्गुण ईश्व-राचे । तेही झाला आपणची ॥ ५१ ॥ कैसा मक्षका सा कळला । फेरा चोऱ्याशिंचा चुकला ॥ ५२ ॥ अहो दृश्य माया जाती । निरसुनी ब्रिद होती ॥ ५३ ॥ कैसें अर्ध उर्ध्व केलें । कैसें सीत उष्ण गेलें ॥ ५४ ॥ कैसी भुक तहान गेली । कुंडलनी चेताविली ॥ ५५ ॥ सोहं धारण कोणती । तीही जाणावी निरुती ॥ ५६ ॥ कैसें मन स्थिर केलें । कैसें चंचळ निश्चळ झालें ॥ ५७ ॥ डोळे उफराटे लाविले । शून्य भेदून निरशुन्य झालें ॥५८॥

निर्विकल्प समाधीची । सांग धारणा ती कैसी ॥ ५९ ॥ पहा संसार तो कोण । त्यासी द्यावें ओळखून ॥ ६० ॥ जाणे सद्गुरूचा बाळ । इतरासी तें न कळे ॥ ६१ ॥ इतुका शोध करुनी घेतां । सायोज्यपद येई हाता ॥ ६२॥ मुळापासुनी विस्तार । सांगितला थोडा फार ॥ ६३ ॥ तुका ह्मणे ज्ञानबोध गुरुकृपें व्हाल सिद्ध ॥ ६४ ॥

॥ ६२९१ ॥ मूळ शोधिलें आपुलें। सद्गुरुकृपें ऐसें झालें ॥ १ ॥ मुळापासोनी विस्तार । ऐका ओंकाराचें सार ॥ २ ॥ निरंजनीं निराकार। तेथें जन्मला ओंकार ॥३॥ प्राण राहतो सहस्रदळीं । तेथुनी अजपती झाली ॥ ४ ॥ अहो इडा आणि पिंगळा । तिसरी ब्रह्मांडीं ती कळा ॥ ५ ॥ अहो चंद्र सूर्य दोन । त्यांचें पुशिलें ठिकाण ॥ ६ ॥ सूर्य आहे नाभिकमळीं । चंद्र पाहे देखे दळीं ॥ ७ ॥ अर्ध चंद्र अर्धी मात्रा । जाण सद्गुरुच्या पुत्रा ॥ ८ ॥ अष्टदळीं जीव राहे । सहावे दळीं शीव पाहे ॥ ९ ॥ चारी शून्याचें ठिकाण । एक महा शून्य जाण ॥ १० ॥ स्थूळ सूक्ष्म कारण जरी । महा कारण त्या शेजारीं ॥११॥ महा शून्य निरशून्यीं । जन्मलें हो तया स्थानीं ॥ १२ ॥ चहूं देहांचें ठिकाण । घेई ब्रह्मांडीं शोधून ॥ १३ ॥ मन आणि मुखापासून । परा पश्यंती ती जाण ॥ १४ ॥ ध्यान वसे हृदयांतरीं । वसे मध्यमा वैखरी ॥ १५ ॥ बारा सोळा दश भासे । सत्रावी ती मुखीं वसे ॥ १६ ॥ षड् अक्षरीं एकचि ब्रह्म । सर्व व्यापुनी गेलें वर्म ॥ १७ ॥ पन्नासांचा पसारा । दोअक्षरीं मंत्र सारा ॥ १८ ॥ हें तों संतांचें निज गुज । दहा अंगुळें मंत्रराज ॥ १९ ॥ जें कां दृष्टीचें आगर । तेंचि मेरूचें शिखर । ॥ २० ॥ साता पासोनी चौदा झालीं । गुरुपुत्रा अनुभविलीं ॥ २१ ॥ अतळ वितळ भूतळ । जाण चवथें सुतळ ॥ २२ ॥ ज्ञान सातवें पातळ । एकचि स्वर्गाचा हा खेळ ॥ २३ ॥ पाठीं एकविस मनकुळा । पहा शोधोनियां बाळा ॥ २४ ॥ सोळा अंगुळें पृथवी । देहीं शोधोनियां घेई ॥ २५ ॥ आकाशाचा वायू जाण । विस अंगुळें प्रमाण ॥२६॥ कोठें एक्यासी सवालक्ष। एकापासूनी मग अनेक ॥२७॥ नीर क्षीर दधि जाण। सिंधु क्षार मन मदन ॥ २८ ॥ नव नाहीं स्वस्वरुपीं जाण । गुरु कृपें घे अवलोकून ॥ २९ ॥ छत्तीस तत्वांचा विचार । गुरुकृपें जाण सार ॥ ३० ॥ सहस्र दळीं अनुहात। दश निधी वाजे नित्य ॥ ३१ ॥ दोन एकवीस जाण । कोटी बहात्तर प्रमाण ॥ ३२ ॥ हृदयकमळीं वसे मन । नाभीं वसे तो पवन ॥ ३३ ॥ त्रि-

कुटी सूक्ष्म देह दोन । सलोक समीपता जाण ॥ ३४ ॥ गोलांट श्री हाट मंडळ देहीं । स्वरूप पाहतां योजतां पाही ॥ ३५ ॥ चारी मुद्रा शोध केला । अलक्ष लक्षुनी राहिला ॥ ३६ ॥ त्रिपद गायत्री पाहे । चौथा निर्गुणी तो आहे । ३७ ॥ सच्चिदानंद परमेश्वर । जयापासोनी विस्तार ॥ ३८ ॥ त्रि-कुटीच्या तीन वाटा । मार्ग तयांचा उलटा ॥३९॥ माया मिथ्या रूप असे । अज्ञानासी सत्य भासे ॥ ४० ॥ अविद्या तें जग जळ । जग व्यापिलें सकळ ॥ ४१ ॥ ब्रह्म तेंचि हा निर्गुण । निराकार तें सगुण ॥ ४२ ॥ निर्गुणांतुनी देह आला । जेथील तेथें विलया गेला ॥ ४३ ॥जीव चिद्रुपाचे परी । शीव गुणातीत हरी ॥ ४४ ॥ तुर्या अवस्था उन्मनी । चौदा देहांची साक्षिणी ॥ ४५ । पुरुषापासोनी प्रकृती । गुरुकृपें पहा प्रचिती ॥ ४६ ॥ तत्वा-पासून तत्व झालें । तत्व तत्वेंचि ग्रासिलें ॥४७॥ स्वप्न प्रपंच मिथ्या होय । गुरु कृपें सत्य होय ॥ ४८ ॥ पंच पिंड ब्रह्मांडीं जाण । दसवा देश प्राण ॥ ४९ ॥ सत्य चक्रें अनुभवावीं । गुरुकृपें झालीं ठावीं ॥ ५० ॥ कार्य श-ब्दचि राहिलें । देखणें दृष्टीचें ठेलें ॥ ५१ ॥ सर्व साधनाशेवटीं । जीव शीव पडल्या गांठी ॥ ५२ ॥ आज आसनीं बैसावें । षट्चक्र भेदुनी जावें ॥ ५३॥ परात्पर जो प्रकाश । झाला आपण सौरस ॥ ५४ ॥ विवेक वैरा-ग्य झालें । षड्रिपू सांग केलें ॥ ५५ ॥ मोक्ष गुरु कृपें कळलें । निज स्वरू-पीं मिळालें ॥ ५६ ॥ निर्गुण गुणासीं आलें । सहजचि माऊल झालें ॥५७॥ गुरुकृपें ऐसें झालें । निरंजनीं शीतळ केलें ॥ ५८ ॥ शोधणार ते राम । तेथें केलें सर्व काम ॥ ५९ ॥ डोळे लाविले उफराटे । निर्गुणासी झाली भेट ॥ ६० ॥ गुरु ज्ञानाची दिवटी । संसारमाया सांटी ॥ ६१ ॥ ऐसें कळलें जयाला । गुरु कृपा झाली त्याला ॥६२॥ इतुका शोध ज्यानें केला । तोची सायोज्यते गेला ॥ ६३ ॥ गुण निर्गुणाचा झाडा । ब्रह्मज्ञानाचा निवाडा ॥ ६४ ॥ ऐसी श्रीगुरु माउली । निगम बोली प्रगट केली ॥ ६५ ॥ श्रीगुरु-सी उपमा नाहीं । आतां द्यावें आतां कांहीं ॥ ६६ ॥ तुका तुजलागीं सांग-ता । नाहीं नाहीं सद्गुरुनाथा ॥ ६७ ॥

# चमत्कार.

## लोहगावीं कीर्तनात मेलें मूल जीत झालें ते समयीं स्वामींनीं अभंग केले ते.

॥ ६२९२ ॥ अशक्य तों तुह्मा नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ॥ १ ॥ मागें काय जाणों स्वामींचे पवाडे । आतां कां रोकडे दावूं नये ॥ २ ॥ थोर भाग्य आह्मी समर्थाचे कासे । ह्मणावितों दास काय थोडें ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझे निववावे डोळे । दावूनि सोहळे समर्थ्याचे ॥ ४॥

॥ ६२९३ ॥ दाता तो एक जाणा । नारायणा स्मरवी ॥ १ ॥ आणीक नासिवंतें काय । न सरे हाय ज्याच्यानें ॥ २ ॥ यात्रें तया काकुलती । जे दाविती सुपंथ ॥ ३ ॥ तुका ह्मणे उरी नुरे । त्याचे खरे उपकार ॥ ४ ॥

## चिंचवडचे देवांनीं तुकोबांस जेवावयास नेलें असतां त्यांस चमत्कार दाखविला ते अंभग.

॥ ६२९४ ॥ वांजा गाई दुभती । देवा ऐशी तुझी ख्याति ॥ १ ॥ ऐसें मागत नाहीं तुज । चरण दाखवावे मज ॥ २ ॥ चातक पाखरूं । त्यासी वर्षे मेघ धारु ॥ ३ ॥ पक्षी राजहंस । अमोलिक मोती त्यास ॥ ४ ॥ तुका म्हणे देवा । कां गा खोचलासी जीवा ॥ ४ ॥

॥ ६२९५ ॥ आवडीचा हेवा सांगतों मी देवा । दोन्ही पात्रें ठेवा आम्हापासीं ॥ १ ॥ तुह्मापाशी तैसीं ठेवावीं निरुती । सारुनी आइती भोजनाची ॥ २ ॥ रागा आले देव म्हणती हा वेडा । तुका ह्मणे पुढां कळेईल ॥ ३ ॥

॥ ६२९६ ॥ भोजन सारिलें आर्त न समाये । एकत्वचि होय भिन्न लीला ॥ १ ॥ सगुणाची पूजा विधान सारिलें । घेतला तांबूल पाडिभरें ॥२॥ देवभक्त स्तुती करिती अपार । तेणें होय भार शरीरासी ॥ ३ ॥ जोडुनियां कर ठेवियला माथा । तुका ह्मणे आतां क्षमा करा ॥ ४ ॥

॥ ६२९७ ॥ परतें मी आहे सहजाचि दुरी । वेगळें भिकारी नामरूपा ॥१॥ नलगे रुसावें धरावा संकोच । सहज तें नीच आलें भागा ॥ २ ॥ पडिलिये ठायीं उच्छिष्ट सेवावें । आर्थ तेंचि देवें केलें ऐसें ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही आम्हां जी वेगळे । केलेती निराळे द्विज देवें ॥ ४ ॥

॥ ६२९८ ॥ चिंतामणि देवा गणपतीशी आणा । करावें भोजना दुजे पात्रीं ॥ १ ॥ देव म्हणती तुक्या एवढी कैंची थोरी । अभिमानाभीतरी नागवलों ॥ २ ॥ वाडवेळ झाला शिळें झालें अन्न । तटस्थ ब्राह्मण बैसलेती ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा तुमच्या सुकृतें । आणीन त्वरित मोरयासी ॥४॥

॥ ६२९९ ॥ भोक्ता नारायण लक्ष्मीचा पति । ह्मणोनि प्राणाहुती घेतलिया ॥ १ ॥ भर्ता आणि भोक्ता कर्ता आणि करविता । आपण सहजता पूर्णकाम ॥ २ ॥ विश्वंभर कृपादृष्टि सांभाळीतो । प्रार्थना करितो ब्राम्हणाची ॥ ३ ॥ कवळोकवळीं नाम घ्यावें गोविंदाचें । भोजन भक्तांचें तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ६३०० ॥ माझा स्वामी तुझी वागविनो लात । तेथें मी पतित काय आलों ॥ १ ॥ तीर्थें तुमच्या चरणीं जाहालीं निर्मळ । तेथें मी दुर्बळ काय वाणूं ॥ २ ॥ तुका ह्मणे तुम्ही देवा द्विजवंद्य । मी तों काय निंद्य हीन याति ॥ ३ ॥

## चिंचवडच्या देवास आपल्या स्वरूपाचा बोध व्हावा ह्मणून उपदेश केला.

॥ ६३०१ ॥ अणुरेणीयां थोकडा । तुका आकाशा एवढा ॥ १ ॥ गिळून सांडिलें कलिवर । भवभ्रमाचा आकार ॥ २ ॥ सांडिली त्रीपुटी । दीप उजळला घटीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । उरलों उपकारा पुरता ॥४॥

## अनघड सिद्धाच्या शब्दें करून रामेश्वर भटाच्या शरीरीं दाह झाला तो या अभंगें शमला.

॥ ६३०२ ॥ चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र ही न खाती सर्प तया ॥ १ ॥ विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्या-

सी ॥ २ ॥ दुःख तें देईल सर्व सुखफळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥ ३ ॥ आवडेल जीवां जीवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥ ४ ॥ तुका ह्मणे कृपा केली नारायणें । जाणिजे ते येणें अनुभवें ॥ ५ ॥

## शिवाजी राजे यांनीं स्वामींस अबदागिरी, घोडा, कारकुन असे न्यावयास पाठविले त्यांस परत पाठवून राजास व अष्टप्रधानांस पाठविलेले अभंग

॥ ६३०३ ॥ दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे ॥ १ ॥ आतां येथें पंढरिराया । मज गोविसी कासया ॥ २ ॥ मान दंभ चेष्टा । हें तो शूकराची विष्ठा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । माझे सोडवणे धांवा ॥ ४ ॥

॥ ६३०४ ॥ नावडे जें चित्ता । तेंचि होसी पुरविता ॥ १ ॥ कां रे पुरविसी पाठी माझी केली जीवें साटी ॥ २ ॥ न करावा संग । वाटे दुरावावें जग ॥ ३ ॥ सेवावा एकांत । वाटे न बोलावी मात ॥ ४ ॥ जन धन तन । वाटे लेखावें वमन ॥ ५ ॥ तुका म्हणे सत्ता । हातीं तुझ्या पंढरिनाथा ॥ ६ ॥

॥ ६३०५ ॥ विरंचीनें केलें ब्रह्मांड सकळ । तयामाजी खेळ नाना युक्ति ॥ १ ॥ युक्तीचा बाळक ब्रह्मनिष्ठ ज्ञानी । गुरुभक्ति मनीं विश्वासेंसी ॥ २ ॥ ऐसा तुझा प्रेमा कळे कांहीं एक । पाहूनियां लेख पत्रिकींचे ॥ ३ ॥ शिव तुझें नाम ठेविलें पवित्र । छत्रपति सूत्र विश्वाचें कीं ॥ ४ ॥ व्रत नेम तप ध्यानयोग कळा । करूनी मोकळा झालासी तूं ॥ ५ ॥ हेत हा लागला आमुचिये भेटी । पत्रामाजि गोष्टी हेचि थोर ॥ ६ ॥ याचें हें उत्तर ऐकगा भूपति । लिहिली विनंति हेताचि हे ॥ ७ ॥ अरण्यवासी आह्मी फिरों उदासीन । दर्शनही हीन अमंगळ ॥ ८ ॥ वस्त्राविण काया झालीसे मळीन । अन्नरहित हीन फळाहारी ॥ ९ ॥ रोकडे हातपाय दिसे अवकळा । काय तो सोहळा दर्शनाचा ॥ १० ॥ तुका ह्मणे माझी विनंति सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नका ॥ ११ ॥

॥ ६३०६ ॥ ऐसी माझी वाणी दीनरूप पाहे । हे त्या करुणा आहे हृदयस्थाची ॥ १ ॥ नहों कीविलवाणें नाहीं आह्मी दीन । सर्वदा शरण पांडुरंगीं ॥ २ ॥ पांडुरंग आह्मा पाळिता पोसिता । आणिकांची कथा काय

तेथें ॥ ३ ॥ तुझी भेट घेणे काय हें मागणें । आशेचें हें शून्य केलें आम्ही ॥ ४ ॥ निराशेचा गांव दिधला आम्हांसी । प्रवृत्ति भागासी सांडियेलें ॥ ५ ॥ पतिव्रतेचें हें मन पति भेटो । तैसे आम्ही विठोमाजी नांदों ॥ ६ ॥ विश्व हें विठ्ठल नाहीं दुज कांहीं । देखणें तुझेंही तयामाजी ॥ ७ ॥ तुजही विठ्ठल ऐसेंचि वाटलें । परि एक आलें आश्चर्य हें ॥ ८ ॥ सद्गुरुश्रीरामदासाचें भूषण । तेथें घालीं मन चळों नको ॥ ९ ॥ बहुतां ठायीं वृत्ति चावळली जेव्हां । रामदास्य तेव्हां घडे कैसें ॥ १० ॥ तुका म्हणे बापा चातुर्यसागरा । भक्तिभाव तारा भाविकांसी ॥ ११ ॥

॥ ६३०७ ॥ तुम्हांपाशीं आम्ही येऊनियां काय । वृथा सीण आहे चालण्याचा ॥ १ ॥ मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासी हे थोर चिंध्या बिदीं ॥२॥ निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी आवरण आकाशाचें ॥ ३ ॥ तेथें काय करणें कवणाची आस । वांयां होय नाश आयुष्याचा ॥ ४ ॥ राजगृहा यावें मनाचिये आसे । तेथें काय वसे समाधान ॥ ५ ॥ रायाचिये घरीं भाग्यवंता मान । इतरां सामान्यां मान नाहीं ॥ ६ ॥ देखोनियां वस्त्रें भूषणांचें जन । तात्काळ मरण येतें मज ॥ ७ ॥ ऐकोनियां मानाल उदासता जरी । तरी आम्हां हरी उपेक्षीना ॥ ८ ॥ आतां हेंचि तुम्हा सांगणें कौतुक । भिक्षेऐसें सुख नाहीं नाहीं ॥ ९ ॥ तपव्रतयाग महाभले जन । आशाबद्धहीन वर्तताती ॥ १० ॥ तुका म्हणे तुम्ही श्रीमंत मानाचे । पूर्वींच दैवाचे हरिभक्त ॥ ११ ॥

॥६३०८॥ आतां एक योग साधावा हा नीट । भल्याचा तो वीट मानूं नये ॥ १ ॥ जेणें योगें तुम्हां घडों पाहे दोष । ऐसा हा सायास करूं नये ॥२॥ निंदक दुर्जन संग्रहीं असती । त्यांची युक्ति चित्तीं आणूं नका ॥ ३ ॥ परिक्षावे कोण राज्याचे रक्षक । विवेकाविवेक पाहोनियां ॥ ४ ॥ सांगणें न लगे सर्वज्ञ तूं राजा । अनाथांच्या काजा साह्य व्हावें ॥ ५ ॥ हेंचि ऐकोनियां चित्त समाधान । आणिक दर्शनें चाड नाहीं ॥ ६ ॥ घेऊनियां भेटी कोण हा संतोष । आयुष्याचे दिस गेले गेले ॥ ७ ॥ एकदोनी कर्मे जाणोनियां वर्मे । आपुलिया श्रमें राहूं आतां ॥ ८ ॥ कल्याणकारक अर्थ याचा एक । सर्वां भूतीं देख एक आत्मा ॥ ९ ॥ आत्मारामीं मन ठेवूनियां राहे । रामदासीं पाहें आपणेयां ॥ १० ॥ तुका म्हणे राया धन्य जन्म क्षितीं । त्रैलोकीं हे ख्याति कीर्ति तुझी ॥ ११ ॥

॥ ६३०९ ॥ राया छत्रपती ऐकावें वचन । रामदासी मन लावी वेगीं ॥ १ ॥ रामदास स्वामी सोयरा सज्जन । त्याशीं तनमन अर्पी बापा ॥ २ ॥ मारुति अवतार स्वामी प्रगटला । उपदेश केला तुज लागीं ॥ ३ ॥ रामनाम मंत्र तारक केवळ । झालासे शीतळ उमाकांत ॥ ४ ॥ उफराटें नाम जपतां वाल्मीक । झाला पुण्यश्लोक तात्कालीक ॥ ५ ॥ तोचि बीज मंत्र वसिष्ठउपदेश । याहूनि विशेष काय आहे ॥ ६ ॥ आतां धरूं नको भलत्याचा संग । राम पांडुरंग कृपाकरी ॥ ७ ॥ धरूं नको आशा आमुची कृपाळा । रामदासीं डोळा लावी आतां ॥ ८ ॥ तुझी चाड आम्हां नाहीं छत्रपति । आह्मी पत्रपति त्रैलोक्याचे ॥ ९ ॥ चारी दिशा आम्हां भिक्षेचा आधार । नेमिली भाकर भक्षावया ॥ १० ॥ पांडुरंगीं झाली आमुची हे भेटी । हातांत नरोटी दिली देवें ॥ ११ ॥ आतां पडूं नको आमुचीये काजा । पवित्र तूं राजा रामभक्त ॥ १२ ॥ विठ्ठलाचे दास केवळ भिकारी । आम्हां वधीं हरी उपेक्षिना ॥ १३ ॥ शरण असावें रामदासा लागीं । नमन साष्टांगीं घाली त्यासी ॥ १४ ॥ तुका म्हणे राया तुज असो कल्याण । सद्गुरू शरण राहे बापा ॥ १५ ॥

॥ ६३१० ॥ आतां हे विनवणी प्रधानअष्टक । प्रभूसी विवेक समजावा ॥ १ ॥ प्रतिनिधी मानरक्षक चतुर । सात्विकाचें घर तुह्मापाशीं ॥ २ ॥ मजुमुचे धणी लेखनकारक । पत्रींचा विवेक समजावा ॥ ३ ॥ पेशवे सुरनिस चिटणीस डबीर । राजाज्ञा सुमंत सेनापाति ॥ ४ ॥ भूषण पंडितराय विद्याधन । वैद्यराजा नमन माझें असे ॥ ५ ॥ पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनी । विवंचोनि श्रवणीं घाला तया ॥ ६ ॥ सात्विक प्रेमळ दृष्टांताच्या मतें । बोलिलों बहुत कळावया ॥ ७ ॥ यथास्थित निरोप सांगणें हा राया । अर्थ पाहा वांयां जाऊं नेदी ॥ ८ ॥ भिडेसाठीं बोला गाळूनी अर्थातें । अनर्थकारी तुमतें होईल तेणें ॥ ९ ॥ तुका ह्मणे तुह्मां नमन अधिकाऱ्यां सांगणें तें राया पत्र माझें ॥ १० ॥

## शिवाजी स्वतः दर्शनास आले व स्वामीपुढें जवाहिरांनी भरलेलें ताट ठेविलें ते अभंग.

॥ ६३११ ॥ जाणोनि अंतर । टाळिसील करकर ॥ १ ॥ तुज लागली हे खोडी । पांडुरंगा बहु कुडी ॥ २ ॥ उठविसी दारीं । धरणें एखादिया परी ॥ ३ ॥ तुका म्हणे पाये । कैसे सोडीन ते पाहे ॥ ४ ॥

॥ ६३१२ ॥ नाहीं विचारीत । मेघ हागणदारी सेत ॥ १ ॥ नये पाहों त्याचा अंत । ठेवीं कारणापें चित्त ॥ २ ॥ वर्जीत गंगा । नाहीं उत्तम अधम जगा ॥ ३ ॥ तुका म्हणे मळ । नाहीं अग्नीसी विटाळ ॥ ३ ॥

॥ ६३१३ ॥ काय दिला ठेवा । आह्मां विठ्ठल चि व्हावा ॥ १ ॥ तुह्मी कळलेती उदार । साठीं परिसाची गार ॥ २ ॥ जीव दिला तरी । वचना माझ्या नये सरी ॥ ३ ॥ तुका म्हणे धन । आम्हां गोमासा समान ॥ ४ ॥

॥ ६३१४ ॥ पिकवावें धन । ज्याची आस करी जन ॥ १ ॥ पुढें उरे खातां देतां । नव्हे खंडण मवितां ॥ २ ॥ खोलीं पडे ओलीं बीज । तरी च हातीं लागे निज ॥ ३ ॥ तुका ह्मणे धनी । विठ्ठल अक्षरें हीं तिन्हीं ॥ ४ ॥

॥ ६३१५ ॥ मुंगी आणि राव । आह्मां सारिखाचि जीव ॥ १ ॥ गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ॥ २ ॥ सोनें आणि माती । आम्हां समान हे चित्तीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आलें । घरा वैकुंठ सगळें ॥ ४ ॥

॥ ६३१६ ॥ तिहीं त्रिभुवनीं । आह्मी वैभवाचे धनी ॥ १ ॥ हातां आले घाव डाव । आमचा मायबाप देव ॥ २ ॥ काय त्रिभुवनीं बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्ता । अवघी आमुची च आतां ॥ ४ ॥

॥ ६३१७ ॥ आह्मी तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥ १ ॥ तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिके समान ॥ २ ॥ कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ॥ ३ ॥ म्हणवा हरिचे दास । तुका म्हणे मज हे आस ॥ ४ ॥

---

अलकापुरीं ( आळंदीं )त ब्राह्मण धरणें बसून बेताळीस दिवस उपवासी होता त्यास ज्ञानोबांनीं स्वप्नीं येऊन सांगितलें कीं देहूस तुकोबापाशीं जाणें ब्राह्मण स्वामीपें आला त्यास करून दिलेले अभंग.

---

॥ ६३१८ ॥ श्रीपंढरीशा पतितपावना । एक विज्ञापना पायांपाशीं ॥ १ ॥ अनाथां जीवांचा तूं काजकैवारी । ऐसी चराचरीं ब्रीदावळी ॥ २ ॥ न सांगतां कळे अंतरींचें गुज । आतां तुह्मी लाज तुज देवा ॥ ३ ॥ आलिंगन ज्याचें करिसी समाधान । अभयाचें दान देऊनियां ॥ ४ ॥ तुका ह्मणे तूंचि खेळें दोहीं ठायीं । नसेल तो देई धीर मना ॥ ५ ॥

॥ ६३१९ ॥ अगा ये उदारा अगा विश्वंभरा । रखुमाईच्या वरा पांडुरंगा ॥ १ ॥ अगा सर्वोत्तमा अगा कृष्णा रामा । अगा मेघश्यामा विश्वजनिता ॥ २ ॥ अगा कृपावंता जीवन तूं दाता । अगा सर्वसत्ता धरितया ॥ ३ ॥ अगा सर्वजाणा अगा नारायणा । करुणावचना चित्त द्यावें ॥ ४ ॥ तुका ह्मणे नाहीं अधिकार तैसी । सरती पायांपाशीं केली मागें ॥ ५ ॥

॥ ६३२० ॥ नव्हे दास खरा । परि झाला हा डांगोरा ॥ १ ॥ यासी काय करूं आतां । तूं हें सकळ जाणता ॥ २ ॥ नाहीं पुण्य गांठीं । जें हें वेचूं कोणासाठीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे कां उपाधि । वाढविली कृपानिधि ॥ ४ ॥

॥ ६३२१ ॥ तुजविण सत्ता । नाहीं वाचा वदविता ॥ १॥ ऐसे आह्मी जाणों दास । ह्मणोनी झालों उदास ॥ २ ॥ तुह्मी दिला धीर । तेणें मन झालें स्थिर ॥ ३ ॥ तुका ह्मणे आड । केलों मी हें तुझें कोड ॥ ४ ॥

॥ ६३२२ ॥ काय मी जाणता । तुह्माहूनी अनंता ॥ १॥ जों हा करूं अतिशय । कां तुम्हां दया नये ॥ २ ॥ काय तुज नाहीं कृपा । विश्वाचिया मायबापा ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी । माझी वदे तुह्मांहूनी ॥ ४ ॥

॥ ६३२३ ॥ काय ज्ञानेश्वरीं उणें । तिहीं पाठविलें धरणें ॥ १॥ ऐकोनियां लिखित । म्हूण जाणवली हे मात ॥ २॥ तरी जाणे धणी । वदे सेवकाची वाणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ठेवा । होतां सांभाळावें देवा ॥ ४ ॥

॥ ६३२४ ॥ ठेवुनियां डोई । पायीं झालों उतराई ॥ १ ॥ कारण तें तुह्मी जाणां । मी तराळ नारायणा ॥२ ॥ प्रसंगीं वचन । दिलें तेंचि खावें अन्न ॥ ३ ॥ तुका ह्मणे भार । तुह्मी जाणां थोडा फार ॥ ४ ॥

---

वरील अभंग व त्यांबरोबर दिलेला नारळ टाकून ब्राह्मण
अळंदीस गेला त्यावर स्वामींनीं ज्ञानेश्वरास पत्र
लिहिलें ते अभंग.

---

॥ ६३२५ ॥ नको कांहीं पडों ग्रंथाचिये भरीं । शीघ्र व्रत करीं हेंचि एक ॥ १ ॥ देवाचिये चाडे आळवावें देवा । ओस देहभावा पाडोनियां ॥ २ ॥ साधनें घालिती काळाचिये मुखीं । गर्भवास सेखीं न चुकती ॥ ३॥

उधाराचा मोक्ष होय नव्हे ऐसा । पतनासी इच्छा अवश्यक ॥ ४ ॥ रोकडी पातली अंगसंगे जरा । आतां उजगरा कोठवरी ॥ ५ ॥ तुका ह्मणे घालीं नामासाठीं उडी । पांडुरंग थडी पाववील ॥ ६ ॥

॥ ६३२६ ॥ नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोळें । आणूनि निराळें द्यावें हातीं ॥ १ ॥ इंद्रियांचा जय साधुनियां मन । निर्विषय कारण असे तेथें ॥ २ ॥ उपास पारणीं अक्षरांची आटी । सत्कर्मा शेवटीं असे फळ ॥ ३ ॥ आदरें संकल्प वारीं अतिशय । सहज तें काय दुःख जाण ॥ ४ ॥ स्वप्नींच्या घायें विवळसी वांयां । रडे रडतियासवें मिथ्या ॥ ५ ॥ तुका ह्मणे फळ आहे मुळापाशीं । शरण देवासी जाय वेगीं ॥ ६ ॥

॥ ६३२७ ॥ त्यजिलें भेटवी आणुनि वासना । दाविलयाचे जना काय काज ॥ १ ॥ आळवावें देवा भाकुनि करुणा । आपुलिया मना साक्ष करीं ॥ २ ॥ नाहीं जावें यावें दुरूनि लागत । आहे साक्षभूत अंतरींचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे हा आहे कृपासिंधु । तोडी भवबंधु तात्काळिक ॥ ४ ॥

॥ ६३२८ ॥ गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥ १ ॥ मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥ आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे आळी । जेवी नुरे चि वेगळी ॥ ४ ॥

॥ ६३२९ ॥ ज्याचें जया ध्यान । तें चि होय त्याचें मन ॥ १ ॥ ह्मणऊनि अवघे सारा । पांडुरंगा दृढ धरा ॥ २ ॥ सम खुण ज्याचे पाय । उभा व्यापक विटे ठाय ॥ ३ ॥ तुका ह्मणे नभा । परता अनूचा ही गाभा ॥ ४ ॥

॥ ६३३० ॥ पाहुनियां ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हां आलें जाण फळ त्याचें ॥ १ ॥ नाहीं तरि वांयां केली तोंडपिटी । उरी ते शेवटीं उरलीसे ॥ २ ॥ पढोनियां वेद हरिगुण गावे । ठावें तें जाणावें तेव्हां झालें ॥ ३ ॥ तप तीर्थाटणें तेव्हां कार्यसिद्धी । स्थिर राहे बुद्धि हरिच्या नामीं ॥ ४ ॥ यागयज्ञादिक काय दानधर्म । तरि फळ नाम कंठीं राहे ॥ ५ ॥ तुका ह्मणे नको कावाडाचे भरीं । पडों सार धरीं हें चि एक ॥ ६ ॥

॥ ६३३१ ॥ सुखें खावें अन्न । त्याचें करावें चिंतन ॥ १ ॥ साचें दिलें सासी । पावे फळ आपणासी ॥ २ ॥ आहे हा आधार । नाम त्याचें विश्वंभर ॥ ३ ॥ नाहीं रिता ठाव । तुका ह्मणे पसरीं भाव ॥ ४ ॥

॥ ६३३२ ॥ संकोचोनि काय झालासी लहान । घेई अपोशण ब्रह्मांडाचें ॥ १ ॥ करोनि पारणें आंचवें संसारा । उशीर उशीरा लावूं नको ॥ २ ॥ घरकुलानें होता पडिला अंधार । तेणें केलें फार कासावीस ॥ ३ ॥ झुगारूनि दुरी लपविलें काखे । तुका ह्मणे वाखे कौतुकाचे ॥ ४ ॥

॥ ६३३३ ॥ माझ्या बापें मज दिधलें भातुकें । ह्मणोनि कौतुकें क्रीडा करीं ॥ १ ॥ केली आळी पुढें बोलिलों वचन । उत्तम हें ज्ञान आलें साचें ॥ २ ॥ घेऊनि विभाग जावें लवलाह्या । आलेति या ठाया आपुलिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्ञानदेवीं समुदाय । करावा मी पाय येइन वंदूं ॥ ४ ॥

॥ ६३३४ ॥ ज्ञानियांचा गुरू राजा महाराव । म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हां ॥ १ ॥ मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ॥ २ ॥ ब्रम्हादिक जेथें तुम्हां वोळंगणे । इतर तुळणे काय पुरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेणें युक्तीची ते खोली । ह्मणोनि ठेविली पायीं डोयी ॥ ४ ॥

॥ ६३३५ ॥ बोलिलीं लेकुरें । वेडीं वाकुडीं उत्तरें ॥ १ ॥ करा क्षमा अपराध । महाराज तुह्मी सिद्ध ॥ २ ॥ नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्ञानेश्वरा । राखा पायापें किंकरा ॥ ४ ॥

॥ ६३३६ ॥ काय तुह्मी जाणां । करूं अन्हेर नारायणा ॥ १ ॥ तरी या लटिक्याची गोही । निवडली दुसरे ठायीं ॥ २ ॥ कळों अंतरींचा गुण । नये फिटल्यावांचून ॥ ३ ॥ आणिलें अनुभवा । जनाच्या हें ज्ञानदेवा ॥ ४ ॥ आणीक कोणी भिती । यांच्या चिंतनें विश्रांति ॥ ५ ॥ तुका ह्मणे बीज पोटीं । फळ तैसें चि सेवटीं ॥ ६ ॥

॥ ६३३७ ॥ अविश्वासीयाचें शरीर सुतकी । विटाळ पातकी भेद वाही ॥ १ ॥ काय त्याचा वेळ जाईल मांडवा । होता तैसा ठेवा आला पुढें ॥ २ ॥ मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा । कपाळींचा धोंडा उभा ठाके ॥ ३ ॥ तुका ह्मणे जैसा कुचराचा दाणा । परिपाकीं अन्ना न मिळे जैसा ॥ ४ ॥

॥ ६३३८ ॥ तामसाचीं तपें पापाची सिदोरी । तमोगुणें भरीं घातले ते ॥ १ ॥ राज्यमदा आड सुखाची संपत्ति । उळंबूनि जाती निरयगांवा

॥ २ ॥ इंद्रियें दमिलीं इच्छा जीती जीवीं । नागविती ठावीं नाहीं पुढें ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरिभजनावांचुन । करिती तो सीण पाहों नये ॥ ३ ॥

॥ ६३३९ ॥ हरिकथेवांचुन इच्छिती स्वहित । हरिजन चित्त न घला तेथें ॥ १ ॥ जाईल भंगोन आपुला विश्वास । होईल या नास कारणांचा ॥ २ ॥ ज्याचिया बैसावें भोजनपंगती । त्याचिया संगती तैसें खावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय झालेती जाणते । देवा ही परते थोर तुह्मी ॥ ४ ॥

॥ ६३४० ॥ सेवकें करावें स्वामीचें वचन । त्यासी हुंतूंपण कामा नये ॥ १ ॥ घेईल जीव कां सारील परतें । भंगलिया चित्तें सांदी जेना ॥ २ ॥ खद्योतें दावावी रवी केवीं वाट । आपुलें चि नीट उसंतावें ॥ ३ ॥ तुका म्हणे तो ज्ञानाचा सागर । परि नेंदी अगर भिजों भेदें ॥ ४ ॥

॥ ६३४१ ॥ जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥१॥ करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥२॥ जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥ ३ ॥ तुका म्हणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्ताचिया ॥ ४ ॥

॥ ६३४२ ॥ बहुतां छंदाचें बहु वसे जन । नये वाटुं मन त्यांच्या संगें ॥ १ ॥ करावा जतन आपुला विश्वास । अंगा आला रस आवडीचा ॥ २ ॥ सुखाची समाधि हरिकथा माउली । विश्रांति साउली सिणलियां-ची ॥ ३ ॥ तुका म्हणे बुडे बांधोनि दगड । तेथें काय कोड धांवा-याचें ॥ ४ ॥

॥ ६३४३ ॥ हरिकथे नाहीं । विश्वास ज्याचे ठायीं ॥ १ ॥ त्याची वाणी अमंगळ । कान उंदराचें बीळ ॥ २ ॥ सांडूनि हा रस । करिती आणीक सायास ॥ ३ ॥ तुका म्हणे पिसीं । वांयां गेलीं किती ऐसीं ॥४॥

॥ ६३४४ ॥ प्रेम अमृताची धार । वाहे देवा ही समोर ॥ १ ॥ ऊर्ध्व-वाहिनी हरिकथा । मुगुटमणि सकळां तीर्थां ॥ २ ॥ शिवाचें जीवन । जाळी महादोष कीर्तन ॥ ३ ॥ तुका म्हणे हरि । इची स्तुति वाणी थोरी ॥ ४ ॥

॥ ६३४५ ॥ आतां माझ्या मना । इची घडो उपासना ॥ १ ॥ ऐसें करी पांडुरंगा । प्रेमवोसंडेसें अंगा ॥ २ ॥ सर्व काळ नये । वाचे विट आड भये ॥ ३ ॥ तुका वैष्णवा संगती । हेंचि भजन पगती ॥ ४ ॥

॥ ६३४६ ॥ उपास कराडी । तिहीं करावीं बापुडीं ॥ १ ॥ आम्ही विठोबाचे दास । चिंता झुगारिली आस ॥ २ ॥ भक्तीच्या उत्कर्षे । नाहीं मुक्तीचें तें पिसें ॥ ३ ॥ तुका म्हणे बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥ ४ ॥

॥ ६३४७ ॥ करविली तैसी केली कटकट । वांकडें कीं नीट देव जाणे ॥ १ ॥ कोणाकारणें हें झालेंसे निर्माण । देवाचें कारण देव जाणे ॥ २ ॥ तुका म्हणे मी या अभिमाना वेगळा । घालूनी गोपाळा भार असें ॥ ३ ॥

॥ ६६४८ ॥ तुह्मी येथें पाठविला धरणेकरी । त्याची झाली परी आइका ते ॥ १ ॥ आतां काय पुढें वाढवुनि विस्तार । झाला समाचार आइका तो ॥ २ ॥ देवाचे उचित एकादश अभंग । महाफळ त्याग करूनी गेला ॥३॥ तुका म्हणे सेवा समर्पूनी पायीं । झालों उतराई ठावे असा ॥४॥

## ज्ञानेश्वराची स्तुती.

॥ ६३४९ ॥ ज्ञान राजा माझा योग्याची माऊली । जेणें निगमावली प्रगट केली ॥ १ ॥ छपन्न भाषेचा केलासे गौरव । भवार्णवीं नाव तरावया ॥ २ ॥ गीता आलंकारी नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी प्रगटली ॥ ३ ॥ श्रवणाच्या मिसें बैसावें येवोनी । समरस होवोनि सुखें नांदा ॥ ४ ॥ अध्यात्मविद्येचें करुनीयां रूप । उजळीला दीप चैतन्याचा ॥ ५ ॥ तुका ह्मणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एकतरी ओवी अनुभवी ॥ ६ ॥

॥ ६३५० ॥ चला आळंदीला जाऊं । ज्ञानदेवा डोळां पाहूं ॥ १ ॥ होतील संताचिया भेटी । सुखाचिया सांगों गोष्टी ॥२ ॥ ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखीं ह्मणतां चुकती फेर ॥ ३ ॥ तुम्हां जन्म नाहीं एक । तुका ह्मणे माझी भाक ॥ ४ ॥

## वाराणसीस यात्रा चालली तेव्हां तुकारामबावांनीं भागीरथीस पत्र धाडिलें ते अभंग.

॥ ६३५१ ॥ परिसे वो माते माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ भागीरथी महादोष निवारणी । सकळा स्वामिणी तीर्थांचिये ॥ २ ॥

जीतां मुक्ति मोक्ष मरणें तुझ्या तिरीं । ऐहिक्यपरत्रीं सुखरूप ॥ ३ ॥ तुका विष्णुदास संतांचें पोसणें । वाक्पुष्प तेणें पाठविलें ॥ ४ ॥

॥ ६३५२ ॥ तुह्मी विश्वनाथ । दीन रंक मी अनाथ ॥ १ ॥ कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ॥२॥ काय उणें तुम्हांपाशीं । मी तों अल्पें चि संतोषी ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ॥ ४ ॥

॥ ६३५३ ॥ तीर्थी तीर्थी राज वर्णिलीं पुराणीं । प्रयाग त्रिवेणी क्षेम देती ॥ १ ॥ देवांसी दुर्लभ तीरीं तुझा वास । आल्याच्या कामास इच्छा पुरे ॥ २ ॥ मुख्य भागिरथी दोष निवारिणी । यमुना निर्विघ्नी महा दोष ॥ ३ ॥ अक्षयी वट तो संगमीं विराजे । दर्शनें सहज पाप जाय ॥ ४ ॥ माघ स्नान घडे संगमीं प्राणिया । दिव्य होय काया पुण्य बहू ॥ ५ ॥ संगमीं मरण घडे थोर पुण्य । इच्छितार्थ देणें याचकासी ॥ ६ ॥ ऐसी कीर्ति जगीं विराजे त्रिलोकीं । भुक्ति मुक्ति सुखी सर्व प्राणी ॥ ७ ॥ ऋषी मुनी सिद्ध वास तुझा तिरीं । ब्रम्हदेवें तरी याग केले ॥ ८ ॥ तुका म्हणे येथें जोडुनियां हात । केला प्रणिपात नाम घेतां ॥ ९ ॥

---

## तुकारामबावांनीं वारकऱ्यां बरोबर पंढरीनाथास पत्र पाठविलें ते अभंग.

---

॥ ६३५४ ॥ कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात । चाल तुज पंढरीनाथ बोलावितो ॥ १ ॥ मग मी न धरीं आस मागील बोभाट । वेगीं धरिन वाट माहेराची ॥ २ ॥ निरांजलें चित्त करितें तळमळ । केधवां देखती मूळ आलें डोळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे कई भाग्याची उजरी । होईल पंढरी देखावया ॥४॥

॥ ६३५५ ॥ कां कोणी न ह्मणे पंढरीची आई । बोलविते पाही चाल नेटें ॥ १ ॥ तेंव्हां माझ्या मना होय समाधान । जाय सर्व शीण जन्मांतर ॥ २ ॥ तुका ह्मणे माझी होईल माउली । वोरसून घाली प्रेमपान्हा ॥ ३ ॥

॥ ६३५६ ॥ कां माझा विसर पडिला मायबापा । सांडियेली कृपा कोण्या गुणें ॥ १ ॥ कैसा कंठूनियां राहों संवसार । काय एक धीर देऊं मना ॥ २ ॥ नाहीं निरोपाची पावली वारता । करावी ते चिंता ऐसी कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे एक वेचूनि वचन । नाहीं समाधान केलें माझें ॥ ४ ॥

॥ ६३५७ ॥ कांहीं माझे कळों आले गुणदोष । म्हणऊनि उदास धरिलें ऐसें ॥ १ ॥ नाहीं तरी येथें न घडे अनुचित । नाहीं ऐसी रीत तया घरीं

॥ २ ॥ कळावें तें मना आपुलिया सवें । ठायींचें हें घ्यावें विचारूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे मज अव्हेरिलें देवें । माझिया कर्त्तव्यें बुद्धीचिया ॥ ४ ॥

॥ ६३५८ ॥ जायाचें शरीर जाईल क्षणांत । कां हा गोपीनाथ पावेचि ना ॥ १ ॥ तुम्ही संत सारे कृपेचे सागर । माझा निरोप फार सांग देवा ॥ २ ॥ अनाथ अज्ञान कोणी नाहीं त्याला । पायांपें विठ्ठला ठेवी मज ॥ ३ ॥ तुका म्हणे जाणे ऐसी करा निरवण । मग तो रक्षण करील माझें ॥ ४ ॥

॥ ६३५९ ॥ नव्हे धीर कांहीं पाठवूं निरोप । आला तरीं कोप येऊ सुखें ॥ १ ॥ कोपोनियां तरी देईल उत्तर । जैसें तैसें पर फिरावूनि ॥ २ ॥ नाहीं तया तरी काय एक पोर । मज तों माहेर आणीक नाहीं ॥ ३॥ तुका म्हणे असे तयामध्यें हित । आपण निवांत असों नये ॥ ३ ॥

॥ ६३६० ॥ आतां पाहों पंथ माहेराची वाट । कामाचा बोभाट पडो सुखें ॥१॥ काय करूं आतां न गमेसें झालें । बहुत सोसिलें बहु दिस ॥२॥ घर लागे पाठी चित्ता उभे वारे । आपुलें तें झुरे पाहावया ॥३ ॥ तुका म्हणे जीव गेला तरी जाव । धरिला तो देव भाव सिद्धी ॥ ४ ॥

॥ ६३६१ ॥ विनवीजे ऐसें भाग्य नाहीं देवा । पायांशीं केशवा सलगी केली ॥१॥ धीटपणें पत्र लिहिलें आवडी । पार नेणे थोडी मति माझी ॥ २ ॥ जेथें देवा तुझा न कळे चि पार । तेथें मी पामर काय वाणूं ॥ ३॥ जैसे तैसे माझे बोल अंगिकारीं । बोबड्या उत्तरीं गौरवितों ॥ ४ ॥ तुका म्हणे विटेवरि जीं पाउलें । तेथें म्यां ठेविलें मस्तक हें ॥ ५ ॥

॥ ६३६२ ॥ देवांच्या ही देवा गोपिकांच्या पती । उदार हे ख्याती त्रिभुवनीं ॥ १ ॥ पातकांच्या रासी नासितोसी नामें । जळतील कर्मे महादोष ॥२ ॥ सर्व सुखें तुझ्या वोळगती पायीं । ऋद्धि सिद्धि ठायीं मुक्ति चारी ॥ ३ ॥ इंद्रासी दुर्लभ पाविजे तें पद । गीत गातां छंद वातां टाळी ॥ ४ ॥ तुका म्हणे जड जीव शक्तिहीन । त्यांचें तूं जीवन पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ६३६३ ॥ काय झालें नेणों माझिया कपाळा । न देखिजे डोळां मूळ येतां ॥ १ ॥ बहु दिस पाहें वचनाची वास । धरिलें उदास पांडुरंगा ॥ २ ॥ नाहीं निरोपाचें पावलें उत्तर । ऐसें तों निष्ठुर न पाहिजे ॥ ३ ॥ पडिला विसर किंवा कांहीं धंदा । साहूनि गोविंदा जरूरसा ॥ ४ ॥ तुका म्हणे आलें वेचाचें सांकडें । देणें घेणें पुढें तो ही धाक ॥ ५ ॥

॥ ६३६४ ॥ एवढा संकोच तरि कां व्यालासी । आम्ही कोणांपाशीं तोंड वासूं ॥ १ ॥ कोण मज पुसे सिणलें भागलें । जगीं मोकलिलें तुम्हीं देवा ॥ २ ॥ कवणाची वाट पाहों कोणीकडे । कोण मज ओढे जिवलग ॥ ३ ॥ कोण जाणे माझे जीवींचें सांकडें । उगवील कोडें संकटाचें ॥ ४ ॥ तुका म्हणे तुम्ही देखिली निश्चिती । काय माझे चित्तीं पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ६३६५ ॥ देई डोळे भेटी न धरीं संकोच । न वलीं कांहीं वेच तुजवरी ॥ १ ॥ तुज बुडवावें ऐसा कोण धर्म । अहर्निशीं नाम घेतां थोडें ॥ २ ॥ फार थोडें कांहीं करूनि पातळ । त्याजमध्यें काळ कडे लावूं ॥ ३ ॥ आहे माझी ते चि सारीन सिदोरी । भार तुजवरी नेदीं माझा ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्हां लेंकराची जाती । भेटावया खंती वाटतसे ॥ ५ ॥

॥ ६३६६ ॥ सीण भाग हरे तेथींचिया निरोपें । देखिलिया रूप उरी तुरे ॥ १ ॥ इंद्रियांची धांव होईल कुंठित । पावेल हें चित्त समाधान ॥ २ ॥ माहेर आहेसें लौकिकीं कळावें । निढळ बरवें शोभा नेदी ॥ ३ ॥ आस नाहीं परी उरी बरी वाटे । आपलें तें भेटे आपणासी ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझी अविट आवडी । खंडण तांतडी होऊं नेदीं ॥ ५ ॥

॥ ६३६७ ॥ धरितों वासना परी नये फळ । प्राप्तीचा तो काळ नाहीं आला ॥ १ ॥ तळमळी चित्त घातलें खापरीं । फुटतसे परी लाहीचिया ॥ २ ॥ प्रकार ते कांहीं नावडती जीवा । नाहीं पुढें ठावा काळ हातीं ॥ ३ ॥ जातें तळा येतों मागुताला वरी । बोळशाचे फेरी सांपडलों ॥ ४ ॥ तुका ह्मणे बहु करितों विचार । उत्तरें डोंगर एक चढें ॥ ५ ॥

॥ ६३६८ ॥ कां माझे पंढरी न देखती डोळे । काय हें न कळे पापा यांचें ॥ १ ॥ पाय पंथें कां हे न चलती वाट । कोण हें अदृष्ट कर्म बळी ॥ २ ॥ कां हें पायांवरी न पडे मस्तक । क्षेम कां हस्तक न पावती ॥ ३ ॥ कां या इंद्रियांचि न पुरे वासना । पवित्र होईना जिव्हा कीर्ती ॥ ४ ॥ तुका ह्मणे कई जाऊनि मोटळें । पडेन हा लोळें महाद्वारीं ॥ ५ ॥

॥ ६३६९ ॥ काय पोरें झालीं फार । किंवा न साहे करकर ॥ १ ॥ ह्मणऊनि केली सांडी । घांस वेऊं न व्हां तोंडीं ॥ २ ॥ करूं कलागती । तुज भांडणें भोंवतीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे टांचें । घरीं झालें सेवरोचें ॥ ४ ॥

॥ ६३७० ॥ कांहीं चिंतेविण । नाहीं उपजत सीण ॥ १ ॥ तरी हा पडिला विसर । माझा तुह्मां झाला भार ॥ २ ॥ आली कांहीं तुटी । गेली सुटोनियां माठी ॥ ३ ॥ तुका ह्मणे घरीं । बहु बैसले रिणकरी ॥ ४ ॥

॥ ६३७१ ॥ निरोपासी वेचे । काय बोलतां फुकाचें ॥ १ ॥ परी हे नेघेवे चि यश । भेओं नको सुखी आस ॥ २ ॥ सुख समाधानें । कोण पाहे देणें घेणें ॥ ३ ॥ न लगे निरोपासी मोल । तुका ह्मणे वेचे बोल ॥ ३ ॥

॥ ६३७२ ॥ जोडिच्या हव्यासें । लागे धनाचें चि पिसें ॥ १ ॥ मग आणिक दुसरें । लोभ्या नावडती पोरें ॥ २ ॥ पाहे रुक्याकडे । मग अवघें ओस पडे ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । तुला बहुत चि हेवा ॥ ४ ॥

॥ ६३७३ ॥ मविलें मविती । नेणों राशी पडिल्या किती ॥ १ ॥ परि तूं धाला चि न धासी । आलें उभाउभीं घेसी ॥ २ ॥ अवघ्या अवघा काळ वाटा पाहाती सकळ ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । अराणूक तुज कांहीं॥ ४ ॥

॥ ६३७४ ॥ न बैससी खालीं । सम उभा च पाउलीं ॥ १ ॥ ऐसे झाले बहुत दिस । झालीं युगें अठ्ठाविस ॥ २ ॥ नाहीं भाग सीण । अराणूक एक क्षण ॥ ३ ॥ तुका म्हणे किती । शापें केलीं देती घेती ॥ ४ ॥

॥ ६३७५ ॥ जोडी कोणासाठीं । एवढी करितोसी आटी ॥ १ ॥ जरी हें आम्हां नाहीं सुख । रडों पोरें पोटीं भूक ॥२॥ करूनि जतन । कोण देसील हें धन ॥ ३ ॥ आमचे तळमळे । तुझें होईल वाटोळें ॥ ४ ॥ घेसील हा श्राप । माझा होऊनियां बाप ॥ ५ ॥ तुका म्हणे उरी । आतां न ठेवीं यावरी ॥ ६ ॥

॥ ६३७६ ॥ करूनि चाहाडी । अवघी बुडवीन जोडी ॥ १ ॥ जरि तूं होऊनि उदास । माझी बुडविसी आस ॥ २ ॥ येथें न करीं काम । मुखें नेघें तुझें नाम ॥ ३ ॥ तुका म्हणे कुळ । तुझें बुडवीन समूळ ॥ ४ ॥

॥ ६३७७ ॥ समर्थाचे पोटीं । आम्हीं जन्मलों करंटीं ॥१॥ ऐसी झाली जगीं कीर्ति । तुझ्या मानाची फजिती ॥२॥ येथें नाहीं खाया । न ये कोणी मूळ न्याया ॥ ३ ॥ तुका म्हणे जिणें । आतां खोटें जीवपणें ॥ ४ ॥

॥ ६३७८ ॥ पुढें तरी चित्ता । काय येईल तें आतां ॥ १ ॥ मज सांगोनियां धाडीं । वाट पाहातों बराडी ॥ २ ॥ कंठीं धरिला प्राण । पायांपाशीं आलें मन ॥ ३ ॥ तुका म्हणे चिंता । बहु वाटतसे आतां ॥ ४ ॥

॥ ६३७९ ॥ कैंचा मज धीर । कोठें बुद्धि माझी स्थिर ॥ १ ॥ जें या मनासी आवरूं । आंत पोटीं वाव धरूं ॥ २ ॥ कैंची शुद्ध मति । भांडवल ऐसें हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे अंगा । कोण दशा आली सांगा ॥ ४ ॥

॥ ६३८० ॥ समर्पक वाणी । नाहीं ऐकिजेसी कानीं ॥ १ ॥ आता भावें करूनि साचा । पायां पडलों विठोबाच्या ॥ २ ॥ न कळे उचित । करूं समाधान चित्त ॥ ३ ॥ तुका ह्मणे विनंती । विनविली धरा चित्तीं ॥ ४ ॥

॥ ६३८१ ॥ येती वारकरी । वाट पहातों तोंवरी ॥ १ ॥ घालूनियां दंडवत । पुसेन निरोपाची मात ॥ २॥ पत्र हातीं दिलें । जया जेथें पाठविलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे येती । जाइन सामोरा पुढती ॥ ४ ॥

॥ ६३८२ ॥ रुळे महाद्वारीं । पायां खालील पायरी ॥ १ ॥ तैसें माझें दंडवत । निरोप सांगतील संत ॥ २ ॥ पडे दंडकाठी । देह भलतीसवा लोटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाळ । लोळे न धरितां सांभाळ ॥ ४ ॥

॥ ६३८३ ॥ माहेरासी जैसा धाडीना सुनेला । मनीं जावयाला आवांकी ते ॥ १ ॥ माझा हेत असे जावें पंढरीसी । परीया ज्वरासी काय करूं ॥ २ ॥ सासू ती सासरा चांडाळ माहेरा । धाडीना दातारा काय करूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे विठो गरुड आहे द्वारीं । न्या मज पंढरी कृपावंता ॥ ४ ॥

॥ ६३८४ ॥ तुह्मीं संतजनीं । माझी करावी विनवणी ॥ १ ॥ काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ॥ २ ॥ भाका बहुतां रीती । माझी कींव काकुलती ॥ ३ ॥ न देखे पंढरी । तुका चरण विटेवरी ॥ ४ ॥

॥ ६३८५ ॥ होईल कृपादान । तरी मी येईन धांवोन ॥ १ ॥ होती संतांचिया भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥ २ ॥ रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ताप । हरती देखोनियां बाप ॥ ४ ॥

॥ ६३८६ ॥ परिसोनि उत्तर । जाब देईजे सत्वर ॥ १ ॥ जरी तूं होसी कृपावंत । तरि हा बोलावीं पतित ॥ २ ॥ नाणीं कांहीं मना । करूनि पापाचा उगाणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । काय शक्ति तुझे पायीं ॥ ४ ॥

॥ ६३८७ ॥ ऐकोनियां कीर्ती । ऐसी वाटती विश्रांती ॥ १ ॥ माते सुख डोळां पडे । तेथें कोण लाभ जोडे ॥ २ ॥ बोलतां ये वाचे । वीट नये जिव्हा नाचे ॥ ३ ॥ तुका ह्मणे धांवे । वासना ते रस घ्यावे ॥ ४ ॥

॥ ६३८८ ॥ किती करूं शोक । पुढें वाढे दुःखें दुःख ॥ १ ॥ आतां जाणसी तें करीं । माझें कोण मनीं धरी ॥ २ ॥ पुण्य होतें गांठी ।

तरि कां लागती हे आटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळ । माझी राहिली तळमळ ॥ ४ ॥

॥ ६३८९ ॥ करील आबाळी । माझ्या दांताची कसाळी ॥ १ ॥ जासी एखादा मरोन । पाठी लागेल हें जन ॥ २ ॥ घरीं लागे कळह । नाहीं जात तो शीतळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोरवडे । मज येतील रोकडे ॥ ४ ॥

॥ ६३९० ॥ आतां आशीर्वाद । माझा असो सुखें नांद ॥१॥ ह्मणसी कोणा तरी काळें । आहेतसीं माझीं बाळें ॥ २ ॥ दुरी दूरांतर । तरी घेसी समाचार ॥ ३ ॥ नेसी कधीं तरी । तुका ह्मणे लाज हरी ॥ ४ ॥

॥ ६३९१ ॥ आतां हे सेवटीं । माझी आईकावी गोष्टी ॥ १ ॥ आतां द्यावा वचनाचा । जाब कळे तैसा याचा ॥ २ ॥ आतां करकर । पुढें न करीं उत्तर ॥ ३ ॥ तुका ह्मणे ठसा । तुझा आहे राखें तैसा ॥ ४ ॥

॥ ६३९२ ॥ बोलिलों तें आतां । कांहिं जाणतां नेणतां ॥ १ ॥ क्षमा करावे अन्याय । पांडुरंगे माझे माय ॥ २ ॥ स्तुती निंदा केली । लागे पाहिजे साहिली ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाड । दिला तैसें पुरवा कोड ॥ ४ ॥

॥ ६३९३ ॥ माझें जडभारी पंढरीचे पारीं । लज्जा नानापरी निवारावी ॥ १ ॥ लिहिल्या पत्रिका धाडूं कोणा हातीं । सांगावी विनंती माझी कोणी ॥ २ ॥ घोडि याचेखुरें उधळिली माती । यावें रातोराती नारायणा ॥ ३ ॥ तुका विष्णुदास संतांचें पोसणें । वाग्पुष्प तेणें पाठविलें ॥ ४ ॥

॥ ६३९४ ॥ पंढरीस जाते निरोप आइका । वैकुंठनायका क्षेम सांगा ॥ १ ॥ अनाथांचा नाथ हें तुझें वचन । धांवें नको दीन गांजों देऊं ॥ २ ॥ ग्रासिलें भुजंगें सर्पें महाकाळें । न दिसे हें जाळें उगवतां ॥ ३ ॥ कामक्रोधसुनीं श्वापदीं बहुतीं । वेढलों आवर्तीं मायेचिये ॥ ४ ॥ मृगजलनदी बुडविना तरी । आणूनियां वरी तळा नेते ॥ ५ ॥ तुका म्हणे तुवां धरिलें उदास । तरि पाहों वास कवणाची ॥ ६ ॥

॥ ६३९५ ॥ कृपाळू सज्जन तुम्ही संतजन । हेंचि कृपादान तुमचें मज ॥ १ ॥ आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा । कींव माझी सगा काकुलती ॥२॥ अनाथ अपराधी पतिता आगळा । परि पायां वेगळा नका करूं ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरि । मग मज हरि उपेक्षीना ॥ ४ ॥

## वारकरी परत येत तोंपर्यंतची मनाची स्थिति.

॥ ६३९६ ॥ माहेरींचा काय येईल निरोप । ह्मणऊनी झोंप नाहीं डोळां ॥ १ ॥ वाट पाहें आस धरूनियां जीवीं । निढळा हे ठेवीं वरी आहे ॥ २ ॥ बोटवरी माप लेखीतों दिवस । होतों कासावीस धीर नाहीं ॥ ३ ॥ काय नेणों संतां पडिला विसर । कीं नव्हे सादर मायबाप ॥ ४ ॥ तुका ह्मणे तेथें होईल दाटणी । कोण माझें आणी मना तेथें ॥ ५ ॥

॥ ६३९७ ॥ परी तो आहे कृपेचा सागर । तोंवरी अंतर पडो नेदी ॥ १ ॥ बहु कानदृष्टी आइके देखणा । पुरोनियां जना उरलासे ॥ २ ॥ सांगितल्याविणें जाणे अंतरींचें । पुरवावें ज्याचें तैसें कोड ॥ ३ ॥ बहुमुखें कीर्ति आइकिली कानीं । विश्वासही मनीं आहे माझ्या ॥ ४ ॥ तुका ह्मणे नाहीं जात वांयाविण । पाळितो वचन बोलिलों तें ॥ ५ ॥

॥ ६३९८ ॥ यावरी न कळे संचित आपुलें । कैसें वोडवलें होईल पुढें ॥ १ ॥ करील विक्षेप धाडितां मुळासी । किंवा धाडा ऐसी तांतडी हे ॥२॥ जोंवरी हे डोळां देखें वारकरी । तों हे भरोवरी करी चित्त ॥ ३ ॥ आस वाढविते बुद्धीचे तरंग । मनाचेही वेग वावडती ॥४॥ तुका ह्मणे तेव्हां होतील निश्चळ । इंद्रियें सकळ निरोपानें ॥ ५ ॥

॥६३९९ ॥ होईल निरोप घेतला यावरी । राऊळाभीतरीं जाऊनियां ॥ १ ॥ करूनियां दधिमंगळ भोजन । प्रयाण शकुन सुमुहूर्तें ॥ २ ॥ होतील दाटले सद्गदित कंठीं । भरतें या पोटीं वियोगाचें ॥ ३ ॥ येरयेरां भेटी क्षेम आलिंगनें । केलीं समाधानें होतीं संतीं ॥ ४ ॥ तुका म्हणे चाली न साहे मनास । पाहती कळस परतोनी ॥ ५ ॥

॥ ६४०० ॥ ऐसी ते सांडिली होईल पंढरी । येत वारकरी होते वाटे ॥ १ ॥ देखिले सोहळे होती आठवत । चालती ते मात करूनियां ॥ २ ॥ केली आइकिली होईल जे कथा । राहिलें तें चित्ता होइल प्रेम ॥ ३ ॥ गरुडटके टाळ मृदंग पताका । सांगती ते एकां एक सुख ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां येती लवलाहीं । आलिंगनीं बाहीं देइन क्षेम ॥ ५ ॥

॥ ६४०१ ॥ क्षेम मायबाप पुसेन हें आधी । न घलीं हें मधीं सुख दुःख ॥ १ ॥ न करीं तांतडी आपणांपासूनी । आइकेन कानीं सांगती ते ॥ २ ॥

अंतरींचें संत जाणतील गुज । निरोप तो मज सांगतील ॥ ३ ॥ पायांवरी डोई ठेवीन आदरें । प्रीतिपडिभरें आळिंगून ॥ ४ ॥ तुका म्हणे काया करीन कुरवंडी । ओंवाळून सांडीं त्यांवरून ॥ ५ ॥

॥ ६४०२ ॥ होईल माझी संतीं भाकिली करुणा । जे त्या नारायणा मनीं बैसे ॥ १ ॥ शृंगारूनी माझीं बोबडीं उत्तरें । होतील विस्तारें सांगितलीं ॥ २ ॥ क्षेम आहे ऐसें होईल सांगितलें । पाहिजे धाडिलें शीघ्र मूळ ॥ ३ ॥ अवस्था जे माझी ठावी आहे संतां । होईल कृपावंता निरोपली ॥ ४ ॥ तुका ह्मणे सर्वे येईल मुऱ्हाळी । किंवा कांहीं उरी राखतील ॥ ५ ॥

॥ ६४०३ ॥ दोहींमध्यें एक घडेल विश्वासें । भातुकें सरिसें मूळ तरी ॥ १ ॥ करिती निरास निःशेष न घडे । कांहीं तरी ओढे चित्त माये ॥ २ ॥ लौकिकाची तरी धरतील लाज । काय माझ्या काज आचरणें ॥ ३ ॥ अथवा कोणाचें येणें लागे रीण । नाहीं तरी हीनकर्मी कांहीं ॥ ४ ॥ व्याळीचिये अंगीं असती वेधना । तुका ह्मणे मना मन साक्ष ॥ ५ ॥

॥ ६४०४ ॥ बैसतां कोणापें नाहीं समाधान । विवरे हें मन तेंचि सोई ॥ १ ॥ घडीघडी मज आठवे माहेर । न पडे विसर क्षणभरी ॥ २ ॥ न बोलावें ऐसा करितों विचार । प्रसंगीं तों फार आठवतें ॥ ३ ॥ इंद्रियांसी वाहो पडिली ते चाली । होती विसांवली येचि ठायीं ॥ ४ ॥ एकसरें सोस माहेरासी जावें । तुका ह्मणे जीवें घेतलासे ॥ ५ ॥

॥ ६४०५ ॥ नाहीं हानि परि न राहावे निसुर । न पडे विसर काय करूं ॥ १ ॥ पुसाविसी वाटे मात कापडियां । पाठविती न्याया मूळ मज ॥ २ ॥ आणीक या मना नावडे सोहळा । करितें टकळा माहेरींचा ॥ ३ ॥ बहु कामें केलें बहु कासावीस । बहु झाले दिस भेटी नाहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे सांचें न कळे अंतर । अवस्था तों फार होते मज ॥ ५ ॥

॥ ६४०६ ॥ तोंवरि म्यां त्यास कैसें निषेधावें । जों नाहीं बरवें कळों आलें ॥ १ ॥ कोणाचिया मुखें तंट नाहीं मागें । वचन वाउगें बोलों नये ॥ २ ॥ दिसे हानि परि निरास न घडे । हे तंव रोकडे अनुभव ॥ ३ ॥ आपुलिया भोगें होईल उशीर । तोंवरि कां धीर केला नाहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे गोड करील सेवट । पाहिली ते वाट ठावी आहे ॥ ५ ॥

॥ ६४०७ ॥ माहेरींचें आलें तें मज माहेर । सुखाचें उत्तर करीन त्यासी ॥ १ ॥ पायांवरी माथा आलिंगीन पायीं । घेईन लवलाहीं पायव-